मासिक

# शिक्षणयात्री

- वर्ष: ८ वे
- फेब्रुवारी २०२३
- अंक: २ रा
- किंमत: ४० रूपये



अक्षरांचा श्रम केला
फळा आला तेणें तो।
अवघियाचा तळ धरी
जीव उरी नुरवुनी।।
फळले तें लवें भारे
पिक खरे आले तेंई।
तुका म्हणे देवा
पुढे भाव सारावा।।

तुकारामबावाच्या अभंगाची गाथा
(सरकारी प्रत)

# वाचलेली... भावलेली पुस्तके..!

## वीणा गवाणकर

भुरा – डॉ.शरद बाविस्कर
चार चपडे मासे – विवेक कुडू
जॉर्ज ऑर्वेल – मनोज पाथरकर
तेल नावाचे वर्तमान – गिरीश कुबेर
ग्रंथाचिया व्दारी – अतुल देऊळगांवकर

## डॉ.प्रकाश आमटे (भामरागड)

अकुपार – ध्रुव भट
तृषार्त पथिक – राधानाथ स्वामी
भुरा – डॉ.शरद बाविस्कर
सात पाटील कुलवृतान्त – रंगनाथ पठारे
मनातला पाऊस – यशवंत गडाख

## इंद्रजीत भालेराव (परभणी)

माणूस असण्याच्या नोंदी– मेघराज मेश्राम
निर्वाणीचा शब्द– रमेश इंगळे उत्रादकर
काय समजलीव्?– प्रशांत डिंगणकर
आठ फोडा आणि बाहेर फेका–अमोल देशमुख

## डॉ.योगेश सुर्यवंशी (धुळे)

(धुळे जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद,धुळे)
शोध एका दिशेचा – संदीप वासलेकर
सोनेरी स्वप्न भंगलेली – वि.स.खांडेकर
अमृत वेल – वि.स.खांडेकर
मंजील दुरच राहिली – न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी

## आरती कुलकर्णी (मुंबई)

सुवर्ण गरुड – मारुती चितमपल्ली
सेपीयन – युवाल नोवा हरारी
अवघा देहची वृक्ष जाहला – वीणा गवाणकर
माझं लंडन – मीना प्रभू
ऋतूचक्र – दुर्गा भागवत
नागझिरा – व्यंकटेश माडगूळकर

## अशोक श्रीराम शिरपूर-धुळे

पिढीजात – श्रीकांत देशमुख
दंशकाल – ऋषीकेश गुप्ते
सातपाटील कुलवृत्तांत – रंगनाथ पठारे
लोक माझे सांगाती – शरद पवार
पांढर – रवींद्र शोभणे
झड झिंबड – कृष्णात खोत

## दासू वैद्य (औरंगाबाद)

कालकल्लोळ – अरुण खोपकर
मी मराठीत बांग देतो

## रेणू दांडेकर (दापोली)

शिकता शिकवता– नीलेश निमकर
रिच डॅडी पूअर डॅडी.
बालकेंद्री शिक्षणाचे नवे आकाश
सृजनाच्या नव्या वाटा

## आबा महाजन (तहसीलदार,शिरपूर)

(साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त)
कोसला – भालचंद्र नेमाडे
तणकट – राजन गवस
शाळा – मिलींद बोकील
हिंदू – भालचंद्र नेमाडे
श्यामची आई – साने गुरुजी

## अमोल बागूल (मुख्याधिकारी,नंदुरबार)

जाती संस्थेचे निर्मुलन – डॉ.बाबासाहेब आंबेडकर
जेव्हा मी जात चोरली होती – बाबूराव बागूल
उत्थान गुंफा – यशवंत मनोहर
शिवाजी कोण होता ? – गोविंद पानसरे
विद्रोही तुकाराम – आ.ह.साळुंखे
गोलपीठा – नामदेव ढसाळ
नंतर आलेले लोक – अरुण काळे
मुक्तायण – कुसुमाग्रज
सेपियन – युवाल नोआ हरारी
ह्युमन काइंड – रुटगर ब्रेगमन

## पृथ्वीराज तौर (नांदेड)

कोसला – भालचंद्र नेमाडे
सत ना गत – राजन खान
दु:खाचे श्वापद – रंगनाथ पठारे
दोन मित्र – भारत सासणे
गोसावी – बाबू बिराजदार
रक्त आणि पाऊस – नागनाथ कोतापल्ले
कधी कधी – मनोहर जाधव
पिढीजात – श्रीकांत देशमुख
पाऊसपुर्ण – जितेंद्र कुवर

**वाचनाने समृध्द होत गेलो...**
शशिकांत हिंगोणेकर/५

**पुस्तकं गुणगुणतात...**
प्रविण बर्दापूरकर/८

**माझे वाचन**
बाबाराव मुसळे/१०

**माझी वाचन प्रेरणा**
फुला बागूल/१२

**माझे बोलके ग्रंथमित्र**
युवराज माने/१४

**पुस्तकां सोबत जगतांना**
विजय गायकवाड/१७

**एक समृध्द जाण**
श्वेतल परब/२१

**बहारदार देशाचं अंतरंग**
डॉ.विवेक पाटकर/२३

**कालचक्र**
सारीका रंधे/२५

**आवर्जुन वाचावी अशी**
रेणुका महेश/२७

**संघर्ष एक आईचा**
पुष्पा पाटील /२८

**शेतकऱ्यांच्या आर्त**
**बाह्य कल्लोळांचा आत्महुंकार...कैवार**
युवराज पवार/२४



मार्गदर्शक
मा.पुरूषोत्तम भापकर (भाप्रसे)
मानद संपादक
सुभाषदादा कुलकर्णी
उप संपादक
संदेश नंदकिशोर हजारे
संपादन सहाय्य
विजय गायकवाड
युवराज माने
डॉ.युवराज पवार
अंक जुळणी
प्रगती आर्टस्,शिरपूर धुळे
मुद्रितशोधन
डॉ.युवराज पवार
मुखपृष्ठ
साभार आंतरजाल
कार्यालय प्रमुख
जगदीश पाटील

**समृद्ध शिक्षण संस्कारासाठी ...**

मासिक
# शिक्षणयात्री

।। ज्ञानम् सर्वजण हिताय ।।

वर्ष : ८ वे अंक: २ रा फेब्रुवारी २०२३

**वार्षिक:रू.४००/-** **द्वैवार्षिक:रू.७००/-** **त्रैवार्षिक:रू.१०००/-**

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.
**Online** पेमेंट साठी - खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri
बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No.13320200000322
IFSC Code : BARB0SHIRPU
वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे



संपर्क पत्ता-
संपादक शिक्षण यात्री
शैलनंद,प्लॉट नं.५२ शिवपार्वती कॉलनी करवंद नाका,मु.पो.ता.-शिरपूर जि-धुळे ४२५४०५
(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)



लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी पीआरबी ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील सर्व दावे शिरपूर न्यायकक्षेंतर्गत.

संवाद



*सुभाषदादा कुलकर्णी*
*संपादक*

'वाचाल तर वाचाल', 'ग्रंथ हेच गुरु' या व अशा अनेक वाचनासंबंधीच्या उक्ती आता ऐकून - ऐकून ,वाचून - वाचून शिळ्या झाल्या आहेत. त्या काळातील वाचनाचे साहित्य आणि आज असलेले वाचन साहित्य, त्या काळात वाचकांसाठी असलेली उपलब्धता आणि आज असलेली उपलब्धता ही कालपरत्वे बदललेली आहे. एखादा लेखक आवडला तर त्याच्या सर्व साहित्याची किंवा आवडलेली साहित्यकृतीची पारायणे करणारा वाचक वर्ग त्याकाळी होता. एखादा आवडलेला पिक्चर मी लागोपाठ २५- ५० वेळा पाहिला असे सांगणारे शौकीन जसे त्या काळात होते तसं अमुक एक कादंबरी मी २५ वेळा वाचली असं सांगणारा वाचक वर्ग ही होता. आज जेवणातल्या व्यंजनांच्या आवडीनिवडीप्रमाणे वाचकांची आवड ही भिन्न होती. काहींना बाबुराव अर्नाळकरांच्या रहस्यकथा आवडायच्या तर काहींना गुलजार नंदांच्या हिंदी कादंबऱ्या, काहींना पु ल देशपांडे, चि वी जोशी यांचे विनोदी साहित्य आवडायचे तर काहींना ना.सी फडके यांचे लेखन आवडायचे. साहित्यातील ऐतिहासिक कादंबऱ्या आवडणारा एक वाचक वर्ग ही होता  पुस्तकांचे रूप वेगळे झाले आहे डिजिटल लायब्ररी ,डिजिटल बुक्स याची उपलब्धता इतक्या प्रमाणात झाली आहे तर 'तेथे पाहिजे जातीचे' म्हणजे वाचक वृत्तीचे! उपलब्धता खूप आहे. आज तर गुगलच्या सहाय्याने आपल्याला हवे ते पुस्तक , हवे त्या विषयावरील ज्ञान घरबसल्या विनासायास आणि म्हटलं तर विना खर्चाने उपलब्ध होते. मला आठवते मी आठवीत असताना बी ए च्या अभ्यासक्रमात स्वामी कादंबरीचा समावेश होता. आमच्या मराठीच्या शिक्षकांनी ते बी ए करत असल्यामुळे ती कादंबरी घरी आणली होती. त्याचे वाचन झाल्यावर सायंकाळी ते पुस्तक मला देऊन त्यांच्या मित्राकडे ही कादंबरी परत करून येण्यास सांगितले. त्या संधीचा फायदा घेऊन ते पुस्तक त्यांनी सांगितलेल्या मित्राकडे न पोचवता मी पूर्ण रात्र जागून संपूर्ण कादंबरी वाचून काढली आणि सकाळी सरांच्या मित्राकडे दिली. मी स्वामी कादंबरी वाचली याचा मला त्या काळात खूप अभिमान होता. माझ्या मित्र परिवारात मी मोठ्या हुशारीने ही गोष्ट सांगे. जेव्हा माझ्या सरांना ही गोष्ट कळाली तेव्हा त्यांनी माझ्या वाचन वेडाचे कौतुक केले.आज मी जे बोलू शकतो,लिहू शकतो त्याचे श्रेय मी त्या काळात केलेल्या वाचनाला आहे.आणि आमच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून अनेकांनी वाचन छंदासंबंधीचे आपले अनुभव कथित केले ते नक्कीच वाचन संस्कृतीला प्रेरणा देणारे ठरतील असा आशावाद करायला हरकत नाही .

माझे वाचन

# वाचनाने समृध्द होत गेलो...




**शशिकांत हिंगोणेकर**
जळगांव

प्राथमिक शाळेत शिकत असतानाच मला कथा,कविता आवडायच्या. अभ्यासक्रमात असलेल्या कविता माझ्या सहजच पाठ व्हायच्या. शाळेत आणि घरी मी त्या गुणगुणत असायचो. आपणही कविता लिहावी असे मनात यायचे.पण ते जमायचे नाही. मनात मात्र कवितेची बीजं पेरत राहायचो. पुढे कधी तरी कविता उगवतील असे वाटत राहायाचे. एरंडोल येथून जीवन शिक्षण विद्या मंदिरातून माझे प्राथमिक शिक्षण संपले. माझे वडिलांची बदली जळगावी जिल्हा परिषदेत झाली. पाचवीचे माझे शिक्षण ला.ना. सार्वजनिक विद्यालयात जळगाव येथे १९७१ला सुरु झाले. शाळेचे ग्रंथालय समृद्ध होते. ग्रंथालय पाहून ही पुस्तके केव्हा वाचायला मिळतील असे वाचायचे.घरी-दारी मला ही पुस्तकेच डोळ्यासमोर यायची. कधी कधी ही पुस्तके स्वप्नातही भेटायची. शाळेत दर गुरूवारी ग्रंथालयातून ही पुस्तके एकेक करुन वाचायला मिळायची. अधाशासारखे ते मिळेल ते कथेचे,कवितेचे पुस्तक मी वाचून काढायचो. गुरूवार मला खूप आवडायचा. त्या वारी मला नवे पुस्तक वाचायला बदलून मिळायचे.जळगावी शारदा बुक डेपो येथे लहानांपासून मोठ्यापर्यंत वाचायची सर्व प्रकारची पुस्तके मिळायची. बाहेर ती शोकेसमध्ये ठेवलेली असायची. ती पुस्तके पाहायलाही मी जायचो. ती वाचायची म्हटली तर विकतच घ्यावी लागतील म्हणून दरमहा माझे वडिलांचा पगार झाला की ,आठ आणे वडिलांकडून घेऊन दरमहा एक तरी कथा/कवितेचे पुस्तक घरी आणायचो. शेजारी डॉ. दातार आणि बेंद्रे ही ब्राह्मण कुटुंबे होती. अभय,विद्याधर,मनोज,अजय असे या कुटुंबातील मुले मित्र म्हणून भेटले. त्यांचे घरीही पुस्तके असायची ती ही मी वाचायला आणायचो. हा वाचनाचा छंद पुढे खूप वाढला. व.वा. वाचनालय,महाविद्यालयातूनही मी पुस्तके वर्गणीदार होऊन नियमित वाचायचो. वाचून मन नेहमी प्रसन्न व्हायचे.नूतन मराठा महाविद्यालयात आले नंतर मला वाचनासाठी प्राचार्य डॉ. के. आर सोनवणे यांनी ग्रंथालय खुले केले. मला मी मागणी करेल तेवढी पुस्तके वाचायला ग्रंथालयातून मिळू लागली. कथा,कविता,कांदब-या आणि वाङ्मयीन नियतकालिकेही वाचायला मिळत होती. अस्मितादर्श,प्रतिष्ठान,युगवाणी,सत्यकथा अशी दर्जेदार नियतकालिके मी नियमित वाचत राहिलो. मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे ही माधव कोंडविलकरांची कांदबरी तर मी वर्गात तासाला बसूनच एक दिवस वाचून काढली. कांदबरीतील दलित नायक जो शिक्षक असतो,त्याला जातीचे चटके सहन करावे लागत असतात. एवढेच नाही तर त्याचे वर्गातील विद्यार्थीही दलित शिक्षकाची साऊली अंगावर पडू नये. याची खबरदारी घेतात. ही गोष्ट त्या शिक्षकाच्या मनात वेदनादायी ठरते. गावात जातीमुळे घर मिळत नाही. मानसिक छळ समाजाकडून होतो. म्हणून तो बदलीसाठी अपार प्रयत्न करतो आणि अखेर देवरुखला त्याची बदली होते. पण जात तिथेही त्याचा पिच्छा सोडत नाही. जातीव्यवस्था किती छळत असते. हे वाचून माझ्या डोळ्यात अंगाराचे पाणी आलेच होते .वाचनाने मी समृद्ध

तर होतच होतो.त्याच बरोबर घडतही होतो. पुढे याच वाचनातून मी सभोवताल वाचत गेलो,अनुभवत गेलो. कविताही मी लिहू लागलो.वाचनाने मला लिहिते केले. जगायला शिकवले. काय वाचले पाहिजे आणि काय लिहिले पाहिजे याची प्रचितीही आली. वाचनाच्या छंदातून माझे जीवन उभे राहिल आहे. वाचन हे मला संजीवक सलाईन सारखे आहे. आयुष्यभरात पुढे हजारो पुस्तके मी वाचली आणि घराचे ग्रंथालय बनवून संग्रहीतही केलीय. रोज एक तरी पुस्तक वाचायला घेतले शिवाय माझा दिवस आणि रात्र उलटत नाही. या छंदातूनच मी कविताही लिहित राहिलो.आज युद्ध सुरु आहे ते युद्धरत अशा पंधरा कवितासंग्रहाचे माझे लेखन झालेय. अजूनही मी लिहितोच आहे. गटशिक्षणाधिकारी,

शिक्षणाधिकारी,विभागीय सचिव या पदावर काम करत असताना साहित्य वाचनाने मला नेहमीच बळ दिलेय.



शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालोय पण वाचनाच्या छंदातून निवृत्ती नाहीच. अलीकडे मी माझे स्नेही लेखक मित्र राजू बावीस्कर यांचे काळ्या निळ्या रेषा हे आत्मकथन मी वाचून काढलेय. या पुस्तकाबद्यल माझ्या भावनाही मी वाचकांसमोर फेसबुकवर पोस्ट केलेल्या आहेत त्या अशा...

**राजू बावस्करांचे काळ्या निळ्यारेषा**

हे पारंपरिक आत्मकथन नाही. सभोवतालच्या व्यक्तींची व्यक्तीचित्रणं आहेत. बलुतं ,अक्करमाशी,उपरा ,मु. पो. देवाचे गोठणे,आयदान ,आठवणींचे पक्षी,मह्या जल्माची चित्तरकथा,आभरान,ऐरणीच्या घना,ढोर,काळे पाणी ही आत्मकथने आहेत. राजूचे हे पुस्तक वाचल्यानंतर माझे त्याच्याशी बोलणे झालेय. आत्मकथन सभोवतालची राजूच्या आयुष्यातील भेटलेली त्याच्या आयुष्याला वळण देणारी  माणसे यात ते जिवंत असे पर्यंत उभी केलेली आहेत.दलित आत्मकथनांनी आंबेडकरी विचार स्विकार करुन सामाजिक समतेची लढाई लढून प्रस्थापित मराठी कादंबरी आणि आत्मचरित्रालाच छेद दिलाय. आठवणींच्या पक्षी सारखेच हे अनुभव कथन राजूने खूप आंतरिक तळमळीने रेखाटलेले आहे. यात शंकाच नाही.दहावी पर्यंतचा आयुष्याचा लेखाजोखा यात आहे. आंबेडकरांचा विद्रोही विचारांचा हलकासा स्पर्श आहे. खरे तर यापुढील लेखन हे त्याच्या आयुष्याचा संघर्ष असणार आहे. दलित आत्मकथनाच्या चौथ्या पिढीचे हे लेखन आहे.आता संघर्ष जसा कालपर्यंत होता. त्याचे स्वरुप बदलले आहे. नवा छुपा जातीयवाद कालपेक्षाही आज छळतोय. नव्या पिढीच्या वाट्याला नवी छळव्यवस्था आलीय. कालचे व्यवस्थेचे छळकरी वेगळे होते. ग्रामीण भागात दलितांना छळणारे कोण होते?आजही छळणारे कोण आहेत?हे जाणून घेतले पाहिजे. सनातनी जी सामाजिक व्यवस्था आहे. जी बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेद्वारे संपवली आहे. परंतु आजही ती व्यवस्था चेहरे बदलून आहे. तिला स्पर्शाचा विटाळ नाही. तिला दलित-मागासलेल्या बहुजन समाजाच्या प्रगतीचा प्रचंड दुःस्वास आहे. या दुःस्वासाविरुद्ध पुन्हा कालची लढाई लढावी लागणार आहेच.या देशाची राज्यघटना ही प्रथम पवित्र

आहे. भारत देशाचे आपण स्वतंत्र नागरिक आहेतच. परंतु हे स्वातंत्र्य अजून सगळ्यांच्या वाट्याला आलेले नाही. बहुजनांची पहिली पिढी शिक्षणामुळे पुढे येते आहे. म्हणूनच आरक्षणा विरुद्ध वातावरण देशात उभ्या केले जात आहे. मंडल आयोग लागू करणा–या व्हि. पी. सिंहाना सत्तेतून पायउतार व्हावे लागले होते. घटनेने नोकरी,आणि शिक्षणातले आरक्षण जोपर्यंत जातीव्यवस्था आहे. तोपर्यंत दिलेले आहे.राजकीय आरक्षण दर दहा वर्षांनी वाढवले जातेय. या आरक्षित जागेवर पंच्चाहत्तर वर्षे झालीत जे निवडून येणारे राजकीय प्रतिनिधी कुणाचे प्रतिनिधित्व करतात.तर ते त्यांच्या पक्षाचे प्रतिनिधित्व करतात. ते मागास समाजाचे नेतृत्व करणारे असते तर हे राजकीय आरक्षण दरवेळी वाढवावे लागले नसते. या आरक्षणाची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दहा वर्षाची मुदत दिली होती. पहिल्या दहा वर्षात मागास समाजाची प्रगती खरे तर व्हायला हवी होती. ती कुठल्याही पक्षाच्या सरकारने खरंच पूर्ण केली आहे का?याचे आत्मपरीक्षण सगळ्यांनीच करायला हवे. भारत जोडो ऐवजी जाती मोडो असे आंदोलन जर कुणी केले तर प्रत्येक भारतीयाने स्वागतासाठी पुढे यायलाच हवे. तरच हा देश सारे जहाँसे अच्छा निश्चितच होईल. काळ्या निळ्या रेषांचे स्वागत आहे.तसेच राजूच्या या पुढील लेखनाला मनःपुर्वक हार्दिक शुभेच्छा!

–९६९९०५९७०७

## वाचावी अशी...शंभर पुस्तके..!

संजय भास्कर जोशी

| अ.क्र. | पुस्तकाचे नांव | लेखकाचे नांव | अ.क्र. | पुस्तकाचे नांव | लेखकाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १) | पण लाक्षात कोण घेतो ? | ह.ना आपटे | १९) | अपेक्षितांचे अंतरंग | श्री.म.माटे |
| २) | चिमणरावाचे चऱ्हाट | चिंतामण जोशी | २०) | माणदेशी माणसं | व्यंकटेश माडगूळकर |
| ३) | सुदाम्याचे पोहे | श्रीपाद कोल्हटकर | २१) | सतरावे वर्षे | पु.भा.भावे |
| ४) | एकच प्याला | राम गडकरी | २२) | कोंडूरा | चिं.त्र्यं.खानोलकर |
| ५) | माझी जन्मठेप | विनायक सावरकर | २३) | गारंबीचा बापू | श्री.ना.खानोलकर |
| ६) | दौलत | ना.सी.फडके | २४) | एक होता कार्व्हर | वीणा गवाणकर |
| ७) | ब्राह्मणकन्या | श्रीधर केतकर | २५) | गंगाधर गाडगीळ | गंगाधर गाडगीळ |
| ८) | माझा प्रवास अथवा १८५७ च्या बंडाची अकिकत | विष्णुभट गोडसे | २६) | मृण्मयी | गो.नी.दांडेकर |
| | | | २७) | ऋतुचक्र | दुर्भा भागवत |
| ९) | श्यामची आई | साने गुरुजी | २८) | एक झाड आणि दोन पक्षी | विश्राम बेडेकर |
| १०) | स्मृतिचित्रे | लक्ष्मीबाई टिळक | २९) | धग | उध्दव ज.शेळके |
| ११) | ययाती | वि.स.खांडेकर | ३०) | सह्याद्रीची चोरी | रमेश मंत्री |
| १२) | कळ्यांचे निःश्वास | विभावरी शिरुरकर | ३१) | अनामिकाची चिंतनिका | पु.य.देशपांडे |
| १३) | दिवाकरांच्या नाट्यछटा | शंकर गर्गे | ३२) | सावित्री | पु.शि.रेगे |
| १४) | संपूर्ण आगरकर निबंधसंग्रह | गोपाळ आगरकर | ३३) | व्यक्ती आणि वल्ली | पु.ल.देशपांडे |
| १५) | रणांगण | विश्राम बेडेकर | ३४) | कोसला | भालचंद्र नेमाडे |
| १६) | पाणकळा | र.वा.दिघे | ३५) | रायगडाला जेव्हा जाग येते | वसंत कानेटकर |
| १७) | काही म्हातारे व एक म्हातारी | वि.द.घाटे | ३६) | स्वामी | रणजित देसाई |
| १८) | गर्भरेशीम | इंदिरा संत | ३७) | चक्र | यशवंत दळवी |

माझे वाचन

# पुस्तकं गुणगुणतात....



**प्रविण बर्दापूरकर**
औरंगाबाद

आईला आम्ही माई म्हणत असू.शिक्षा करण्याची माईची सवय जगावेगळी होती (हे आता जाणवतं!) खोड्या केल्या,चूक गंभीर असली किंवा शेजारपाजारच्या कोणी तक्रार केली तर पाण्यासाठीच्या एका पितळी पिंपात पाण्यात उभं राहण्याची आणि असं उभं असतांना म्हणजे,शिक्षा भोगताना एखादं पुस्तक मोठ्यानी वाचण्याची सक्ती असे.शिक्षेची मुदत संपण्याआत वाचन थांबलं तर शिक्षेच्या मुदतीत वाढ होत असे! यापेक्षा कठोर शिक्षा म्हणजे याचा पिंपात उभं राहून वीरकरांच्या डिक्शनरीतले शब्द पाठ करणे.एखादं अल्फाबेट माई सांगत असे आणि त्या अक्षराने सुरु होणारे इंग्रजी शब्द पाठ करणे हे अतिशय कंटाळवाणे असे.

अचानक पाठ केलेल्या शब्दातले काही शब्दार्थ माई डिक्शनरी हातात घेऊन रॅन्डम विचारत असे.त्याची उत्तरे देता आली तर शिक्षा समाप्त नाहीतर पिंपातल्या पाण्यात उभे राहणे आणि वीरकरांचे पाठांतर पुढे सुरु असा तो मामला असे! वाचनाचा पहिला संस्कार झाला तो असा.या जगावेगळ्या शिक्षेमुळे वाचन- पाठांतरावर लक्ष केंद्रीत करायची सवय लागला ती आजतागायत कायम आहे. जुन्या पुराण्या टाइम्स ऑफ इंडीया आणि एक-दोन दिवस शिळ्या असलेल्या मराठा तल्या दररोज २० ओळी उन्हाळा आणि दिवाळीच्या सुट्टीत लिहिणे बंधनकारक होते. हे लेखन झाल्याशिवाय नाश्ता मिळत नसे आणि असं शुध्दलेखन व्याकरणदृष्टया अचूक असले तर सातूच्या पिठात गुळाचा एखादा खडा किंवा एखादे बिस्कीट बक्षीस म्हणून अतिरिक्त असे.दासबोध,तुकाराम गाथा,कऱ्हेचे पाणी वगैरे वयाच्या बारा-तेरा आधीच वाचून झाली (कळली नाही तो भाग वेगळा.) शब्द केवळ अक्षरांचाच समूह नसतो,त्याला भावना असताना आणि शब्दातला धर्म किंवा जात नसते हाही संस्कार माईचाच. तो बालपणी झालेला. उमलतानाच जाणीव विकसित करणारा पुढचे आयुष्य समृध्द करणारा हा संस्कार केल्याबद्दल माई प्रति कृतज्ञता व्यक्त करायची की जन्म दिल्याबद्दल? इतका हा संपन्न संभ्रम आहे.

वाचनासोबत पाढे-शुभंकरोती काही स्त्रोत्र संध्याकाळी एकदम मस्ट होते.परवचा संपला की लगेच अलिफ बे साठी जावे लागे.मराठवाड्यात तेव्हा सर्वच भाषक शाळांत उर्दु शिकणे कंपलसरी होते.पण, ही सक्ती नंतर बंद झाली.कळत्या वयात डॉ.विनय वाईकर तसेच नारायण कुळकर्णी-कवठेकराची भेट झाल्यावर उर्दू शिकणं राहून गेल्याची सल आजही ठसठसते. परवचा आणि अलिफ बेमुळे उच्चार सुधारतात हाही संस्कार माईचाच( नंतरच्या काळात अभ्यास अवांतर आणि पत्रकारिता करतानाचे अपरिहार्य वाचन तसेच श्रावणात या सवयीचा विलक्षण परिणामकारक उपयोग झाला.सव्वादीड तासाचं भाषण किंवा एखाद्या तेवढ्या वेळात संपणाऱ्या कार्यक्रमाची कोणतेही टिपणं न घेता अचूक रिर्पोटींग करण्याची शैली पत्रकारितेत आल्यावर विकसित झाली ती याच संस्कारातून)पुढे मराठवाडा हे दैनिक,अनंतराव भालेराव,बाबा दळवी आणि पुन्हा माईमुळे वाचनाला दिशा

आणि शिस्त लागली.या शिस्तीतून आणि ग्रंथालय शास्त्राचा अभ्यास करतांना शब्दांची गोडी लागली.शब्दाचा मुळार्थ (अभिधा),व्युत्पत्ती,उच्चार शास्त्र यांच्या वाटेवरचा प्रवास सुरु झाला तो आजही सुरु आहे. याचा एकत्रित परिणाम म्हणजे आजही लक्ष खूप केंद्रीत न करता वाचलं तरी खूपसं लक्षात राहतं.

वाचनाची जागा,वेळ,मूड वगैरे-नखरे तेव्हा नव्हते,आजही नाहीत.अलीकडच्या १८-२० वर्षांत तर विचित्र सवय लागलीये.कार्यालयात एक,घरी दुसरे आणि कारमध्ये किंवा प्रवासात तिसरे अशा एकाच वेळी तीन पुस्तकांचे वाचन सुरु असते आणि महत्वाचे म्हणजे एकातून दुसऱ्याकडे वळताना संदर्भ तुटला असे काहीच होत नाही.सलग वाचन सुरु असल्यासारखी ही प्रक्रिया आपसूकच घडत जाते.हे कथन करताना हटके वाटतंय,पण अगदी सहज घडतं असं,तुटक तुटक तरीही सलग वाचन,हे मात्र खरं,आवडींन किंवा ओढीने खरेदी केलेलं पुस्तक लगेच वाचून होतं असं नाही.अनेकदा खरेदी केल्यावर अचानक वर्ष-सहा महिन्यांची ते पुस्तक हाक मारतं आणि मग वाचन सुरु होतं.काही पुस्तकांना हात लागण्यासाठी त्यापेक्षा जास्तच वेळ लागतो.

पद्मजा फाटक,दीपा गोवारीकर आणि विद्या विदवांस संपादित 'बापलेकी' वाचनासाठी तब्बल चार-साडेचार वर्षांनी मुहूर्त लगला, तर अरुणा ढेरेच्या 'कवितेचच्या वाटेवर' फिरुन यायला एकही दिवस लागला नाही.( हे पुस्तक आधीच हाती आलं असतं,तर इतक्या कविता वाचनात गेलेला वेळ अन्य वाचनासाठी सत्कारणी लागला नसता का?) नंदा खरेंच्या 'कहाणी मानव प्राण्याची' बद्दलही असंच घडलं. अच्युत गोडबोलेंच्या 'अर्थात' ने पदवीचं शिक्षण घेताना अर्थशास्त्राच्या अभ्यासातले 'सेल्फ ॲक्च्युलायझेशन, चा सिध्दांत मांडणारा अब्राहम मॅस्टलॉव्ह वगैरे पुन्हा भेटले आणि लक्षात आलं अरे यांना तर आपण विसरलोच होतो की! अशात म्हणजे या आठ-दहा वर्षांत नॉट विदाऊट माय डॉटर,ब्लास्फेमी, एका साळीयाने ब्र आणि महत्वाचे म्हणजे मौनराग अशी काही पुस्तके मनात कायम मुक्कामाला आली आहेत.कधी कधी एकांतात ती पुस्तके गुणगुणताहेत असंही वाटतं. पुस्तकांचं हे गुणगुणणं विलक्षण मेलोडिसस असतं,कधी ऐकलंय?


- ९८२२०५५७९९

## वाचावी अशी...शंभर पुस्तके..!

**संजय भास्कर जोशी**

| अ.क्र. | पुस्तकाचे नांव | लेखकाचे नांव | अ.क्र. | पुस्तकाचे नांव | लेखकाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| ३८) | युगांत | इरावती कर्वे | ४९) | वीरधवल | नाथमाधव |
| ३९) | निवडक ठणठणपाळ | जयवंत दळवी | ५०) | मी कसा झालो? | प्र.के.अत्रे |
| ४०) | जेव्हा माणूस जागा होतो. | गोदावरी परुळेकर | ५१) | बनगरवाडी | व्यंकटेश माडगूळकर |
| ४१) | गोतावळा | आनंद यादव | ५२) | किमया | माधव आचवल |
| ४२) | नटसम्राट | वि.वा.शिरवाडकर | ५३) | आनंदी गोपाळ | श्री.ज.जोशी |
| ४३) | काजळामाया | जी.ए.कुलकर्णी | ५४) | मुंबई दिनांक | अरुण साधू |
| ४४) | बलुतं | द्या पवार | ५५) | रस अनौरस | राजन खान |
| ४५) | निवडक विज्ञानकथा | निरंजन घाटे | ५६) | स्थलांतर | सानिया |
| ४६) | गोलपीठा | नामदेव ढसाळ | ५७) | बारोमास | सदानंद देशमुख |
| ४७) | मृत्युंजय | शिवाजी सावंत | ५८) | तणकट | राजन गवस |
| ४८) | उपरा | लक्ष्मण माने | ५९) | भर चौकातील अरण्यरुदन | रंगनाथ पठारे |

# माझी वाचन प्रकिया



बाबाराव मुसळे
वाशिम

मी सध्या काय वाचतो ? मी कधी वाचतो ? कुणाचे वाचतो ? जे काही वाचतो ते नेमके कसे वाचतो ? वाचताना काय काय करतो ? वाचल्यावर काय करतो? असे काही प्रश्न माझ्याविषयी एक लेखक म्हणून पडत असतात . आपलं पुस्तक या लेखकाने वाचले पाहिजे म्हणून मग अनेक नवोदित वा मान्यवर लेखकही प्रत्यक्ष भेटीत वा पोस्टाने – कुरिअरने पुस्तके पाठवत असतात . मीही माझ्या उमेदीच्या काळात हेच केले . त्यात गैर असे काही नाही . आपले पुस्तक दिल्यावर – पाठविल्यावर नेमके वाचले गेले की नाही याचीही उत्सुकता असते . त्या उत्सुकतेपोटी मी मोबाइल –फ़ोन नव्हता त्या काळात पोस्टाने रिव्ह्यू घ्यायचो . माझी 'वारुळ' ही कादंबरी २००४ मध्ये साकेत प्रकाशन ,औरंगाबाद यांनी काढली होती . तिच्या प्रती अनेक मान्यवरांना मी पाठविल्या होत्या . त्यावेळी माझ्याकडे टेबल फ़ोन उपलब्ध होता . त्यामुळे त्यातल्या काही जणांशी फ़ोनवरून संपर्क करू लागलो . त्यात एका मान्यवराने असे झापले की माझी लेखक असण्यातली नशाच उतरली . तरीही नंतरच्या काळात प्रकाशित होऊन आलेली पुस्तके पाठवतच होतो . पण रिव्ह्यू घेत नव्हतो . वाचावेसे वाटले तर वाचा . अन्यथा तुमच्या संग्रही असू द्या . तुम्हीच तुमची पुस्तके हाताळताना माझं पुस्तक कधी हातात आले तर माझी लेखक म्हणून आठवण येईल तेवढी मला पुरेशी होती . अलीकडे मात्र मी कोणालाच पुस्तके पाठवत नाही . कारण तो उत्साह आता माझ्यात बाकी उरला नाही .

माझ्याकडे येणाऱ्या पुस्तकांची संख्या माझ्या मानाने मोठीच आहे .त्यात कथा ,कविता ,कादंबऱ्या,चरित्रे ,आत्मचरित्रे, ललित असे सर्व प्रकार असतात . ती सगळी वाचणे मला कधीच शक्य होत नाही . तरी त्यातली निवडक आणि त्यातल्या त्यात जे नवोदित पण त्यांच्या माझ्याकडे आलेल्या पुस्तकाची मला वाटलेली उपयुक्तता.प्रतवारी विचारात घेऊन मी अशी पुस्तकं वाचतो .वाचताना एका हातात शस्त्र म्हणून पेन असतो . मला आवडलेल्या , खटकलेल्या अशा गोष्टींवर खुणा करून त्यांच्या वेगळ्या नोंदी त्याच पुस्तकाच्या शेवटी दिलेल्या कोऱ्या पानांवर, पाने दिली नसतील तर मलपृष्ठांवर किंवा पुस्तकात जेथे कोठे कोरी जागा असेल तेथे लिहितो . अगदी कोठेच जागा नसेल तर वेगळा कोरा कागद घेतो . त्यावर लिहितो . पण लिहितोच . हे सगळं लिहिलेलं नंतर मला त्या पुस्तकाचे परीक्षण लिहिताना उपयोगी पडते . पुस्तकात मी केलेल्या खाणाखुणा आणि मी केलेले वेगळे लेखन यांमुळे त्या पुस्तकाचे रूप विद्रूप होते . पण माझा त्याला इलाज नसतो . अलीकडेच रश्मी पडवाड मदनकर यांच्या 'पद्मकोश'या पुस्तकावर अशाच खाणाखुणा करून त्या पुस्तकाचा कोरेपणाचा खूनच केला . त्यावर विस्तृत असे पंधरा पेजेस परीक्षण लिहिले . त्यांना फ़ोनवर बोलताना म्हणालो ,'रश्मी'तुझ्या पुस्तकाचे मी जे हाल केले ते पाहून तुला अक्षरशः रडू येईल .' त्यावर त्या म्हणाल्या ,'नाना' मला ते पुस्तक हवे आहे . त्याऐवजी मी तुम्हाला दुसरी प्रत

देते .कारण तो माझ्यासाठी अनमोल ठेवा असेल . हा अनुभव मला खूपच मोलाचा वाटला . मी जी जी पुस्तके वाचतो त्या त्या पुस्तकांचे कमीअधीक प्रमाणात असेच हालहाल करतो . त्यादृष्टीने मी एक क्रूर वाचक आहे . या लेखासाठी सध्या मी जे पुस्तक वाचत आहे युवराज माने यांचे ‘ गुरूजी , तू मला आवडलास !’ या पुस्तकाचेही मी तेच हाल केले आहेत .

मित्रहो , वर मी म्हटले की मला एका मान्यवराने झापले . अगदी तसेच एक पुस्तक पाठविणाऱ्या लेखकानेही मला चांगलेच झापले . त्याचे असे झाले – साधारणतः माझ्या संदर्भात ज्या काही गोष्टी नित्यशः घडतात त्या मी निःसंकोचपणे पोस्ट करून फ़ेसबुकवर टाकतो . मागच्या काही महिन्यांआधी मी अशाच मला अभिप्राय द्यायला प्राप्त झालेल्या पुस्तकांसंबंधाने एक पोस्ट टाकली होती . तिचा विषय होता –माझ्याकडे आलेल्या पुस्तकांपैकी मी सध्य स्थितीत एकही पुस्तक वाचू शकत नाही. याचे कारण माझे ‘आक्करबोट्या’ या कादंबरीचे लॅपटॉपने वाचन सुरू आहे . सध्या ती कादंबरी लॅपटापून पूर्ण झाली .तिचे दुसरे वाचन करणे बाकी आहे . मध्ये सध्या जो वेळ मिळत आहे त्यात काही पुस्तके वाचायची असे मी ठरविले आहे . मी कादंबरी लॅपटॉपताना का वाचत नाही ? कारण कादंबरीची जी तंद्री लागते ती तंद्री कायम ठेवायची असेल तर मग असे तिला विचलित करणारे वाचन करू नये असे माझे स्पष्ट मत आहे .त्या माझ्या पोस्टवर अनेकांनी सकारात्मक अन चार दोन जणांनी नकारात्मक कॉमेंट केल्या . त्यातली एक मला झापणारी होती . तिचा आशय होता , ‘ मी तुम्हाला माझी जी कादंबरी वाचायला पाठविली ती कशी आहे हे तुम्हाला माहित आहे? तिच्यावर आतापर्यंत सातजणांनी पीएच. डी . प्राप्त केल्या आहेत .आणि ती कादंबरी तुम्ही वाचत नाही? ’ मी त्या लेखकावर खरंच अन्याय केला असे मला वाटले . अन मी नम्रपणे त्यांना म्हणालो , ‘माझे कादंबरी लेखन संपेपर्यंत तरी मी तुमची कादंबरी वाचू शकत नाही . तुम्ही म्हणाल तर ती मी तुमच्याकडे स्वखर्चाने परत पाठवू शकतो.’ आणि त्यांनी पाठवा म्हटल्यावर मी ती पाठविली . हा अनुभव माझ्यासाठी अत्यंत दुर्मिळ होता .काहीना त्यांच्या येऊ घातलेल्या पुस्तकावर प्रस्तावना वा पाठराखण हवी असते . तेही देताना माझी फ़ुरसद किती हे ठरवूनच देतो . एकाने तोही नवोदितच माझ्याकडून प्रस्तावना लिहून घेतली . अन ऐन वेळेवर दुसऱ्याचीची छापली . मला त्याबद्दल अजूनही काही बोलला नाही . उलट संपर्क तोडला . असे झाले तेव्हा आमच्या एका मित्राच्या अनुभवाची आठवण येते . त्यांनी त्यांच्या वडिलांच्या काव्यात्म हस्तलिखितावर एका दिग्गज अतिज्येष्ठ लेखकाला प्रस्तावना मागितली . तेव्हा त्यांनी ‘ हस्तलिखितासोबत पाच हजार रुपयांचा चेक पाठवा ‘ असे म्हटले होते . आपण तसे करू शकणार नाही. कारण आपण त्या नाव मोठे लक्षण खोटे या प्रकारात मोडत नाही .

मी दोन पद्धतीने वाचन करतो . जेव्हा कादंबरीसारखे मोठे लेखन हाताशी नसते तेव्हा मी आतापर्यंत वाचायचे राहून गेलेल्या किंवा माझ्याकडे येणाऱ्या पुस्तकांतून जास्तीत जास्त नवोदितांची पुस्तके वाचतो . वाटल्यास त्यावर परीक्षण लिहितो . फ़ेसबुकवर टाकतो . संबंधित लेखकाला पाठवितो. कारण त्या लेखकाची ते फ़ेसबुकवर ना येता कुठे नियत –अनियतकालिकात यावे अशी इच्छा असते . मी स्वतःहून कुठल्याही नियत –अनियतकालिकाला ते लेख पाठवित नाही . कधी कधी संबंधित लेखक पाठवितात. कधी ते छापून आल्यावर ना संपादक अंक पाठवितात ,ना संबंधित लेखक कळवित . दुसऱ्या प्रकारचे वाचन माझ्या गरजेतून निर्माण झालेले असते . मी जेव्हा एखादी कादंबरी लिहितो ती लिहिताना किंवा लिहण्यापूर्वी मला काही गोष्टी माहिती असायला हव्या असे वाटते . तेव्हा त्या मिळविण्यासाठी मी संबंधित ग्रंथ वाशीम येथील वाकाटक या जुन्या लायब्ररीतून मिळवून वाचत असे . त्याच्या नोंदीही घेत असे . आता अन्ड्रॉईड आला तेव्हापासून तीही गरज फ़ार सोपी झाली . नेटवर पटकन शोधता येते .

**(बाबाराव मुसळे हे जेष्ठ कथाकार आहेत.)**
**–९३२५०४४२१०**

# माझी वाचन प्रेरणा



प्रा.डॉ.फुला बागूल
शिरपूर-धुळे

माझे बालपण पिंपळनेर सारख्या ग्रामीण परंतु सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध असणाऱ्या गावात गेले . वाचनाचा वारसा आमच्या वडिलांकडून माझ्यापर्यंत आला .आमचे वडील कैलासवासी मोतीराम संपत चौधरी हे स्वातंत्र्यसैनिक होते . हौशी रंगभूमीवरील कलावंत होते .पौराणिक नाटकातील स्त्री पात्रे प्रामुख्याने ते वठवित असत . त्यांचे पाठांतर उत्तम होते . आणि स्मरणशक्ती तेज होती . यामुळे ते सातत्याने वाचन करीत असत .त्यांच्या वाचनात पौराणिक ग्रंथ आणि स्वातंत्र्य सैनिकांची माहिती असलेले ग्रंथ यांचा समावेश असे .त्यांच्या या वाचन तपस्येचा निश्चितच वसा आणि वारसा मला लाभला . त्यातून वाचनाची गोडी वाढत गेली . सुदैवाने पिंपळनेर येथे लोकमान्य टिळक सार्वजनिक ग्रंथालय आहे .ते फार जुने ग्रंथालय आहे . महात्मा गांधीजींनी सुद्धा त्या ग्रंथालयाला भेट देऊन आपल्या हस्ताक्षरात तिथे अभिप्राय नोंदवला आहे .अशा ग्रंथालयात माझी तब्बल दहा वर्षे गेली .रोज सायंकाळी या वाचनालयात मी जात असे . त्याकाळी प्रारंभी जादूचा राक्षस , जादूची छडी यांसारखी बाल वाङ:मयाची पुस्तके मी खूप वाचली आहेत .राजा राणीच्या कथा वाचल्या आहेत .रामायण महाभारताच्या कथा वाचल्या आहेत . त्यावेळी कॉमिक्स हा प्रकार नव्यानेच सुरू झाला होता .कॉमिक्स वाङ्मयाचा नायक टारझन होता . तो जंगलात राहत होता . विविध करामती करत होता .ते वाचून टारझन हा आमचा नायक त्या काळी बनला होता . वाढत्या वयानुसार थोडी समज आल्यानंतर मग मी वर्तमानपत्रे वाचू लागलो . त्यातील अग्रलेख वाचू लागलो .या वाचनाने पुढे मला लेखनाला प्रेरणा लाभली .नंतरच्या काळात आज पावेतो माझ्या हातून अनेक समीक्षा ग्रंथांचे , कथाकवितांचे लेखन झाले . याची बीजे पिंपळनेरच्या सार्वजनिक वाचनालयात वाचलेले वर्तमानपत्र ,मासिके यांच्या वाचनात आहेत .दैनिक केसरी आणि दैनिक गावकरी हे पेपर आवर्जून वाचत असे .दैनिक केसरी मधून राज्याच्या ,देशाच्या तर दैनिक गांवकरी मधून प्रादेशिक स्तरावरच्या घडामोडी कळायच्या .त्या काळातील लोकांचा दैनिक गांवकरीवर खूप विश्वास होता . एखादी गोष्ट छातीठोकपणे सांगायची असेल तर गावकरी मध्ये असं छापून आलेय अशा पद्धतीने संभाषणाचा प्रारंभ त्याकाळी होत होता . दैनिक वर्तमानपत्रांसोबतच आमच्या बालपणी चांदोबा हे सचित्र मासिक येत असे .तेही आम्ही मुलं आवडीने वाचत असू .आमच्या बाल मनाला अद्भुतरम्यतेचे जे आकर्षण होते त्याची पूर्तता चांदोबा ने त्या काळी केलेली होती .याच काळात साने गुरुजींच्या गोड गोष्टी श्यामची आई ही पुस्तके आम्ही वाचली .ग्रंथालयातील वाचनासोबतच आमच्या पिंपळनेरच्या तत्कालीन विद्यानंद हायस्कूलमध्ये वाचनाची चांगली सोय होती . आठवड्यातून एक दिवस वाचनाचा तास असायचा . या तासाला आमचे शिक्षक एक पेटी आणायचे .त्या पेटीत बाल वाययाची पुस्तके असायची प्रत्येक मुलाला एक पुस्तक वाटलं जायचं . तो संपूर्ण तास आम्ही वाचन करत असू .अशा पद्धतीचे वाचन

संस्कार बालपणी माझ्यावर झाल्याने नंतरच्या काळात लेखक म्हणून जी काही कामगिरी करता आली त्याचं सर्व श्रेय पिंपळनेरच्या भूमीमध्ये केलेल्या वाचनालाच जाते. यासोबतच किशोर वयामध्ये आम्ही हिंदी उपन्यास हे देखील खूप वाचलेले आहेत .गुलशन नंदा आणि राणू यांचे हिंदी उपन्यास मोठ्या प्रमाणावर आम्ही त्या काळात वाचले आहेत .अशा रीतीने वाचनाचा श्री गणेशा झाला . बालभारतीचे पुस्तक असो की इतिहासाचे असो हातात पडल्याबरोबर पहिल्याच दिवशी ते वाचून पूर्ण होत असे .यामुळे वर्षभर शिक्षक त्यातील धडा शिकवीत तेव्हा वाचलेले हे सगळे आठवे आणि आमच्या धारणा पक्क्या होत .यातूनच मराठी , इतिहास यां सारख्या विषयात मला नेहमीच चांगले गुण मिळत गेले . वाचनानेच सर्वांगीण श्रीमंती साध्य होते हे वारंवार सिद्ध होत गेले . महाविद्यालयीन जीवनात अभ्यासाच्या निमित्ताने वास्तववादी साहित्य , अस्तित्ववादी साहित्य ,अति वास्तववादी साहित्य , सौंदर्यवादी साहित्य , दलित व ग्रामीण साहित्य , मार्क्सवादी साहित्य अशा विविध साहित्य प्रवाहांचा परिचय झाला .वाङ्:मयाचे सर्व खंड वाचून काढले .पुढे प्राध्यापक झाल्यानंतर विद्यार्थ्यांना शिकविण्याच्या निमित्ताने सर्व संदर्भग्रंथ सर्व , क्रमिक ग्रंथ यांचे वाचन केले . वाचन करताना एक शिस्त स्वतःला लावून घेतली. एकच एक वाङ्:मय प्रकार पूर्ण वाचून टाकायचा. एकाच लेखकाची सगळी पुस्तके वाचून टाकायची. यामुळे एक समग्र लेखक कळतो आणि एखादा विशिष्ट वाङ्:मय प्रकार संपूर्णपणे कळण्यास मदत होते . इयत्ता अकरावी पर्यंतच हजारो पुस्तकं माझी वाचून झालेली होती .पुढे समीक्षा लेखनाच्या निमित्ताने अनेक समीक्षा ग्रंथ वाचले .समीक्षेची मुळाक्षरे जाणून घेतली .यामुळे नंतरच्या काळात काही समीक्षा ग्रंथांचे लेखन माझ्याकडून होऊ शकले . आजवर जी काही लेखन संपदा निर्माण करू शकलो या सर्वांमागे आजपर्यंत केलेली वाचन तपस्या आहे हे निश्चित पणाने सांगता येते . तारुण्यात साधारणपणे विनोदी वाचन करू नये असे माझे मत आहे . तारुण्यात ध्येयवादी गंभीर प्रवृत्तीचे , वैचारिक अशा पद्धतीचे वाचन केले पाहिजे .त्यातून दिशा प्राप्त होते . वाङ्मयीन जाणिवेच्या कक्षा रुंदावतात . विनोदी वाचन हे आयुष्याच्या नंतरच्या टप्प्यात केले पाहिजे . शास्त्रीय स्वरूपाचे ग्रंथ ,विज्ञान साहित्य यांसारख्या प्रांतातही वाचन मुशाफिरी वाचकांनी केली पाहिजे .सर्व प्रकारचे वाचन केलं पाहिजे .विद्यार्थी वर्गाने विशेषतः शब्दकोश वाचले पाहिजेत .व्याकरण वाचले पाहिजे .अभ्यासले पाहिजे . उत्तम उत्तम ग्रंथ वाचले पाहिजे .पदव्युत्तर वर्गाच्या विद्यार्थ्यांनी अनुवादित साहित्य वाचले पाहिजे . ज्यामुळे विश्व साहित्याची त्यांना ओळख होईल .

- ९८२२९३४८४७


## सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ४०० रूपये द्विवार्षिक वर्गणी - ७०० रूपये त्रैवार्षिक वर्गणी-१००० रूपये

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

With pay any app

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री शैलनंद,प्लॉट नं.५२ शिवपार्वती कॉलनी करवंद नाका शिरपूर ता.शिरपुर जि-धुळे ४२५४०५ (मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

# बंद कपाटातील माझे बोलके ग्रंथमित्र



युवराज माने
सेलू-परभणी

दर सहा महिन्यानंतर माझ्या आवडीचं व पुस्तकासोबत निखळ संवाद साधण्याचे काम मला फार आवडतं. असंच हे आवडतं काम आज करताना फार वेगवेगळ्या अनुभवांना सामोरं जावं लागलं. तसं पाहिलं तर हे नेहमीचंच.आमचा हा संवाद आजवर कधीच मी कुठे व्यक्त केला नाही मात्र आज राहवलंच नाही. वाटलं या सर्व अनुभवांना, आमच्या संवादाला कुठेतरी शब्द स्वरूपात मांडावं.ते आत्ता मांडताना मन अगदी मोकळं झाल्यासारखं वाटतं .'वाचणाऱ्याची रोजनिशी ' सतीश काळसेकर यांचं हे पुस्तक वाचलं आणि तेव्हापासून पुस्तकांशी वेगळा संवाद साधायला सुरुवात झाली . खरंच किती छान असतात पुस्तकं! पुस्तकं निर्जीव असतात पण त्यातील अक्षर चिरंतर सजीव असतात.पुस्तकासोबत संवाद साधताना सजीवांच्या तोंडून निघणारे शब्द या सर्व निर्जीव शब्दांपेक्षा जड ,फसवे व निरर्थक वाटतात.

काचेच्या बंद कपाटांमध्ये अतिशय गुण्यागोविंदाने नांदणारे माझे सर्व ग्रंथसखे विनातक्रार नांदायलेली असतात. या सर्वांची धुळ,कीटक, पावसापासून सुरक्षितता व्हावी ,त्यांची अधून मधून स्वच्छता करावी या अनुषंगाने या सर्व ग्रंथसंख्यासोबत दर सहा महिन्यांनी माझा असा संवाद होत असतो. या संवादांमध्ये अनेक लेखक मंडळी मार्गदर्शकाच्या भूमिकेतून मार्गदर्शन करतात तर अगदी काही शांतपणे आपल्या आतमध्ये दडलेल्या अनुभवांचा खजिना माझ्यासमोर रिता करताना पाहायला मिळतो. खरंतर या सर्वांशी रोज संवाद साधायला आवडतं मात्र किती जणांसोबत संवाद साधावा. हा संवाद केवळ सहा महिन्यातून एकदा तोही अल्पसा होतो मात्र सर्वांनाआनंद देऊन जातो. या सर्व ग्रंथसख्यांपैकी कोणत्या ना कोणत्या एका मित्रासोबत रोज संवाद मात्र चालू असतो पण तो संवाद आणि आज सर्वांसोबत स्पर्शात्मक होणारा संवाद काही औरच असतो.

खरंतर या ग्रंथमित्रांची अशा पद्धतीची सेवा करताना जीवन कृतार्थ झालं असंच वाटतं. स्वतःच्या मुलाप्रमाणे या ग्रंथ मित्रांची काळजी घेताना एक वेगळाच अनामिक आनंद सुद्धा मिळतो .एखाद्याचं कव्हर फाटलं असेल, काहींची पानं दुमडली असतील तर काहींवर धूळ साचली असेल हे सर्व स्वच्छ करताना त्या ग्रंथ मित्रालाही होणारा आनंद शब्दात मांडता येत नाही. जवळपास २००० ग्रंथ मित्रांसोबत संवाद साधताना किती दमछाक होत असेल याची कल्पना न केलेली बरी. वर्षातून एकदा का होईना प्रत्येकाशी स्पर्शात्मक संवाद होतो याचं दोहोंनाही समाधान आहे. आज अनेकांनी तर चक्क तक्रारच करायला सुरुवात केली. तसं पाहता त्यांच्या तक्रारी रास्त होत्या. कारण जेव्हापासून त्यांनी माझ्या सदनात वास्तव्य करायला सुरुवात केली तेव्हापासून मी ज्या ठिकाणी त्यांना स्थापित केलं तेव्हापासून ते त्याच ठिकाणी होते. प्रत्येकाला माझ्या शाळेत चालणाऱ्या आनंदाच्या वाचन सोहळ्यामध्ये येऊन माझ्या चिमुकल्या सोबत संवाद साधावा असं वाटायचं. तर काहीजणांना केवळ माझा स्पर्श व्हावा असंही वाटायचं. तर

काही जणांची तक्रार तर फार वेगळी होती. बहुतांश वेळा प्रत्येक महिन्याला वाचून पूर्ण करण्याची पुस्तक बाहेर काढून ठेवत असतो .क्रमानुसार त्यांचे एक वेगळे स्थान ठरवतो. मात्र माझ्या इतर काही कामामुळे या सर्व ग्रंथ सख्यांना जरी जागा बदलली तरी त्याच ठिकाणी बराच वेळ तिष्ठत राहावं लागतं असे आणि पाठीमागून आलेले इतर ग्रंथ मित्र लागलीच वाचण्यास घेतली जातात हे पाहून तर त्यांना माझा राग येत असेल असं जाणवलं.

या सर्व मित्रांमध्ये आनंदी असणारी काही मित्रही होते की ज्यांना वारंवार मला हाताळता येत होतं आणि या हाताळल्यामुळे सातत्याने त्यांचा माझा व माझ्या शाळेतील चिमुकल्यांशी संवाद व्हायचा. खऱ्या अर्थानं मी माझ्या वाचनाचा आनंद घेण्यापेक्षा माझ्या समोरील चिमुकल्या बालकांना आवश्यक असणाऱ्या संदर्भग्रंथांचा जास्त वापर करून त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न असतो त्यामुळे शिक्षण क्षेत्राशी निगडित असलेली माझ्या संग्रहातील सर्व ग्रंथमित्र अतिशय आनंदी असायची असं जाणवलं.२००५ पासून ज्यांनी माझी सोबत केली अशी जिवलग ग्रंथसखे अतिशय निश्चितपणे स्थानपन्न असलेली जाणवली. त्यांच्यावर कुठलाही प्रकारचा प्रभाव झाल्याचं जाणवत नव्हतं कारण २००५ सालापासून त्यांनी येणाऱ्या प्रत्येक इतर ग्रंथ मित्रांचं सहर्ष स्वागत करण्याचे कामच केलं आहे असं जाणवलं. आलेल्या नवीन ग्रंथ मित्राचं स्वागत करून माझ्या वाचनाची व विद्यार्थ्यांसाठी वाचन गोडी लावण्याची पद्धती त्यांना समजावत होती की काय असंच जाणवतं.

तसं पाहिलं तर माझा ग्रंथसंग्रह हा सर्व क्षेत्राशी निगडित असाच आहे. कुठल्याही एका क्षेत्राला धरून वाचन अथवा ग्रंथसंग्रह करणं मला कधी जमलंच नाही .चौफेर वाचन आणि चौफेर ग्रंथ संग्रह हा होत गेला. सर्व ग्रंथ मित्रांशी नेहमी संवाद होतो परंतु वर्षातून एक ते दोन वेळा या सर्वच ग्रंथ मित्रांना माझा स्पर्श होतो किंबहुना त्या सर्वांचा स्पर्श माझ्या कार्याला होतो. आणि दोघांच्याही एकमेकांच्या स्पर्शामुळे आम्ही उल्हासित आणि आनंदित होतो .हे काम खऱ्या अर्थानं खूप आनंदाच.हे काम करत असताना कितीही महत्त्वाचं दुसरं काम आल तरीही ते न करणे हा ठाम निर्णय. म्हणून या सर्व ग्रंथ मित्रांना साफ, स्वच्छ करत असताना जो काही संवाद होतो तो अभूतपूर्वच मानावा लागेल. या संवादात कुणीही आम्हाला डिस्टर्ब करत नाही हे विशेष. त्यामुळे संग्रहात असलेल्या सर्वही मित्रांसोबत होणारा संवाद हा उत्तमच होतो. भूतकाळात जमा केलेल्या या ग्रंथ मित्रांचे वाचन केलेलं असायचं त्याची आठवण याप्रसंगी ताजी व्हायची आणि सर्व आठवायचं हे पुस्तक कधी वाचलं ?,का वाचलं ? केव्हा वाचलं ? त्याचा आपणास कसा उपयोग झाला अगदी भूतकाळातील हे सर्व चित्र उभारायचं.

वाचन हा ठिबक सिंचनाचा प्रयोग आहे हे मी यापूर्वीही ही अनुभवला आहे. असाच अनुभव आजही मला अनुभवता आला.मी ग्रथंसोबत संवाद साधत असताना. प्रयासही या संवादामध्ये नकळतपणे केव्हा सहभागी झाला हे कळलंच नाही. बाहेर काढून ठेवलेल्या ग्रंथासोबत तो खेळू लागला. पुस्तकांवर असलेले वेगवेगळे चित्र ,नाव व त्यांच्या आकारासोबत संवाद साधू लागला. पुस्तकांना एकत्रित करून त्याचे वेगवेगळे आकार तयार करू लागला. आत्तापर्यंत त्याने पाहिलेल्या व अनुभवलेल्या चित्रांपैकी मला विचारणा करू लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, गौतम बुद्ध, शिवाजी महाराज, सावित्रीबाई फुले, महात्मा फुले हे त्यानं आजपर्यत पाहिलेले चित्र त्यानं सहज ओळखले सुद्धा. माझ्याप्रमाणेच माझ्या चिमुकल्या प्रयास ने सुद्धा या ग्रंथांतसोबत संवाद साधला याचंही मला फार अप्रूप वाटलं. मुलांना वाचनाची गोडी लावायची असेल तर अशा पद्धतीची ग्रंथसंपदा प्रथम आपल्या घरात असणं जरुरी आहे. अशाच पद्धतीने ग्रंथांतसोबत बालपणापासून सहवास करत गेल्यास भविष्यात उत्तम प्रकारची वाचक तयार होतील यात शंका नाही. या स्वरूपाचं फार मोठं काम इतर राष्ट्रांमध्ये सहजरित्या केलं जातं. अशा पद्धतीची सुरुवात लेकरांना पुस्तकांसोबत मैत्री करण्याची पहिली पायरी आहे.

आज ग्रंथ मित्रांसोबत संवाद साधत असताना पुन्हा एकदा तक्रार करून वाचनाच्या क्रम ठरविण्यास मला मजबूर केलं त्यामध्ये 'रसीदी टिकट, न छापण्या जोग्या गोष्टी ,सहावे सुख, वेचक-वेधक ,साहित्य; बदलते परिपेक्ष,

एका दिशेचा शोध ,वांजुठाव,माती ,पंख आणि आकाश, बदल पेरणारी माणसं ,कैफियत ,कार्यरत ,झपूर्झा ,रानबखर ,बळीवंश, विद्रोही तुकाराम ,चंदनाचे हात, अशा कितीतरी ग्रंथ मित्रांनी पुन्हा एकदा वाचनाचा क्रम लावण्यास बाध्य केलं.

तर काही ग्रंथ मित्रांनी हे सर्व करत असताना अलगदपणे मला उघडण्यास मजबूर केलं . खूप दिवसांपूर्वी वाचलेले पुस्तक हातात आल्यानंतर पुन्हा एकदा त्यामध्ये डोकावून पाहताना व भूतकाळातील आठवणींना उजाळा मिळताना जो आनंद होतो तो काही वेगळाच असतो.

प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे वाचलेलं 'प्रेरणा' हे पुस्तक तर तीन ते चार वेळा वाचूनही पुन्हा एकदा वाचण्याची इच्छाआहेच. आसाराम लोमटे लिखित 'अलोक' कथासंग्रह व त्यातील शब्दांनी मनामध्ये मिळवलेले स्थान ते काही औरच आहे .अजीम नवाज राही यांच्या 'कल्लोळतला एकांत'या कविता संग्रहाला मला पूर्ण कधीच करता आलं नाही अधून मधून चार कविता वाचणे पुन्हा ठेवून देणे पुन्हा वाचणे पुन्हा ठेवून देणे हा क्रम चालूच आहे साधना आमटे यांचं 'समिधा' वाचून मी कसा अंतर्मुख व आनंदी झालो हे मला पुन्हा एकदा लक्षात आलं .'शब्दांचे धन' वाचतांना मारुती चितमपल्ली यांनी माझ्या ओंजळीत फार वेगळं नवं तेजच दिलं असं भासतं. रक्ताच्यापलीकडचं नातं जपताना डॉक्टर संध्या पवार यांनी भेट म्हणून दिलेलं 'या जन्मावर या जगण्यावर'यातील कथांनी तर मला व माझ्या मुलांना एक वेगळंच वळण दिलं. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या 'जीवनवेध' या पुस्तकांन तर वाचनाचा नूरच बदलून दिला. तर डॉक्टर आ ह साळुंके सरांच्या विविध पुस्तकांनी वास्तवास धरून जीवन जगताना चिकित्सकपणे प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याची शिकवलं. कोणत्या वेळी कोणते पुस्तक खरेदी केलं हेही सहजपणे लक्षात आलं म्हणजेच आपण ग्रंथासोबत निर्माण केलेला जिव्हाळा ,जोडलेलं नातं कसं ताजातवाना राहतो याचीही जाणीव होऊ लागली. आपल्या संग्रहात असलेल्या या ग्रंथ मित्रांकडे पाहून आपण कधी श्रीमंत झालो हे कळलच नाही.या सर्व ग्रंथ मित्रांसोबत राहताना, वाचन करून वेगळ्या रांगेमध्ये स्थापित झालेल्या मित्रांचा आभारदर्शक चेहरा पाहताना माझं मस्तक कृतज्ञतापूर्वक नतमस्तक होतं. ज्या ग्रंथ मित्रांचं वाचन पूर्ण करणं राहिल आहे अशा सर्व ग्रंथ मित्रांनाही कृतज्ञतापूर्वक क्षमा मागताना मला किंचितही वाईट वाटत नाही. उर्वरित सर्व ग्रंथ मित्रांसोबत नक्कीच येणाऱ्या काळामध्ये लवकरात लवकर त्यांच्या अनुभव संपन्न सफरीमध्ये प्रवास करायला मला नक्कीच आवडेल.

असा हा माझ्या संग्रहात असलेल्या ग्रंथ मित्रांसोबत साधलेला संवाद आपल्या सर्वांसोबत व्यक्त करताना पुन्हा एकदा सतीश काळसेकर सरांचे विधान आठवतात.

वाचन हा माझ्यासाठी स्वेच्छेने स्वीकारलेला आनंदाचा सोहळा आहे.

असाच आनंदाचा सोहळा मी व माझ्या चिमुकल्यांनी स्वीकारलेला आहे .आपणही स्वीकारावा व या आनंद सोहळ्याचा आनंद लुटावा या अपेक्षेसह........

(पूर्व प्रसिध्दी जीवनशिक्षण)

-७५१७४७८५७०

माझं वाचन

# पुस्तकांसोबत जगतांना...



**विजय गायकवाड**
कोल्हापूर

राजर्षी शाहू महाराजांच्या करवीर ( कोल्हापूर ) जवळच असलेल्या टोप या गावात मी राहतो.पोट भरण्यासाठी जे काय सर्व संघर्ष करावे लागतात ते मी करतोच.कौटुंबिक जबाबदारी पूर्ण करत असताना माझीही दमछाक होते वैचारिक संघर्ष न पटणारे विचार याने धावत्या जगात मी हे अस्वस्थ होतो.मेनन पिस्टन रिंग टोप संभापूर या कंपनीमध्ये जनरल कास्टिंग (फौन्ड्री) या ठिकाणी मी काम करत आहे.दिवसभर शारीरिक कष्ट करतो,व सायंकाळी माझ्या घरट्याकडे म्हणजेच घराकडे परत येतो.कंपनी ते घर या सरळ मार्गावरील मी सरळ प्रवास करणारा माणूस.. माझ्याही जीवनात चढउतार हे येतात व जातात. या जगण्यावर या मी शतदा प्रेम करतो. हा जीवनातला प्रवास करत असताना एक दिवस आयुष्याला वेगळं वळण देणारी घटना घडली. ती मी आयुष्यभर कधीही विसरू शकणार नाही.

आयुष्यात माझी पुस्तकाशी झालेली सर्वप्रथम तो क्षण माझ्यासाठी जिवंत व अविस्मरणीय होता. स्टीफन हॉकिंग साहेबांनी फार वर्षांपूर्वी सांगून ठेवलेलं होतं की हे सगळं जग आपण फुकट वापरत आहोत या जगाला जर आपल्याला काय परत फुकट द्यायचं असेल तर असं काहीतरी द्या की ज्यामुळे आपल्या मनाला समाधान वाटेल की खरंच आपण काहीतरी या जगाला दिलेलं आहे. कारण अनेकांनी आपल्याला बरचं काही दिलेलं आहे.त्यामुळे आपणही असंच काहीतरी दुसऱ्यांना द्यावं हे ओघाने आलेच.

'तुम्हाला कोणीही बघत नसताना तुम्ही जे असता तेच तुम्ही असता.' हे पुस्तकातील वाक्य मला जगायचं कसं हे सांगून जातं.परिस्थिती बदलल्यानंतर माणसाला बदलण्यास फार वेळ लागतो व त्रासही होतो.पण पुस्तके माझ्या जीवनात अंधकार नष्ट करून सदैव प्रकाशाची योजना करणारा चिरंतन असा प्रकाशाचा ठेवा आहे.वारा जेव्हा आपल्याला अंगाला जाणवत नसतं त्यावेळेला वाऱ्याची दिशा कोणत्या बाजूला आहे हे आपण सहजपणे सांगू शकत नाही,पण त्याचवेळी जर आपण झाडाचा शेंडा पाहिला तर आपल्याला नक्कीच कळतं की वाऱ्याची दिशा कोणती आहे.पुस्तके मला परिस्थिती बदलण्या अगोदर बदलण्याचे बळ देतात.

'ज्या झाडाच्या सावलीत बसण्याचा आपला विचार नसेल.अशी झाड आपण लावली पाहिजेत..!'

हे जिवंतत्व मी पुस्तकातूनच शिकलो आहे.

'पुस्तके ही जमिनीवर असतात पण आकाशाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य ती आपणास देतात.'

पुस्तक वाचल्यामुळे माझ्यामधील 'संयम' वाढीला लागला आहे.जे जसं आहे तसं ते स्वीकारायचं हे सत्य पुस्तक मला नेहमी सांगतात.शरीराच्या वाढीसाठी,विकासासाठी अन्न हे जसं महत्त्वपूर्ण आहे,त्याचबरोबर माणसाचे जीवन सुलभ होण्यासाठी अन्न,वस्त्र,निवारा ही जशी मूलभूत गरज आहे,तसंच पुस्तक वाचन ही सुद्धा एक मूलभूत गरज आहे असं मला वाटतं. पुस्तकाच्या वाचनामुळे माझं अविकसित जीवन विकसित

झालं,विस्तृत झालं व माझं मर्यादित जीवन हे अमर्यादित झालं.मानवी जीवनातील अवघडातील अवघड प्रश्नाची उत्तरे सरळ व सोप्या भाषेमध्ये मला पुस्तकात सापडतात.त्यामुळे मी नेहमीच निवांत व बिनधास्त असतो.कारण पुस्तके माझ्यासोबत असतात.मी दररोज न चुकता वाचन करतो. पुस्तक वाचन करणे आता माझा श्वास बनलेला आहे.

पुस्तक वाचन करणे म्हणजे माझे एक वेळचं जेवण आहे.

कोल्हापूरातील वाचणालयामध्ये सभासद झालो.बरीच पुस्तके वाचलीत.महिण्याकाठी मला पगारापोटी ९ ते १० हजार पगार मिळतो.त्यातील महिण्याला किमान १ हजार ते पंधराशे रुपयाची पुस्तके विकत घेवून वाचतो.

पुस्तक विकत घेणारे आणि वाचणारे लोक कोण असतात.असं तुम्हाला वाटतं ते गरीब नक्कीच नसतात.

कधी कधी पुस्तके वाचायला कमी पडलीत तर आमचे मित्र,मार्गदर्शक मला हवी ती पुस्तके आनंदाने पाठवितात.त्यामध्ये सुनिल घायाळ,माधव गव्हाणे,विष्णु गाडेकर पाटील,डॉ.रवींद्र श्रावस्ती,डॉ.सुधीर सरवदे, विनायक पाटील,शितल खाडे,विश्वास खाडे,तात्या गाडेकर.सतिश खाडे,दादासाहेब ताजणे,राजेश कान्हेकर,संतोष पांचाळ,अनिल फारणे,निखिल इंगळकर व इतर मित्रमंडळी आवर्जुन पुस्तके पाठवतात.त्याच्या ऋणात कायम राहणे मला मनापासून आवडते.

चांगले वाचणे म्हणजे खरी पुस्तके खऱ्या भावबळाने वाचणे.ग्रंथ ज्या हेतुपुरस्सरतेने आणि संयमानेलिहिले जातात,तितक्याच हेतुपुरस्सरतेनेआणि संयमाने ते वाचले गेले पाहिजेत.हेन्री डेव्हिड थोरोने सांगितलेला नियम मी न मोडता पाळतो.त्यामुळे पुस्तके मला 'आपला' म्हणतात.माझ्याकडे सध्या १४८ पुस्तके आहेत.ती ४०७१५ रुपयाची आहेत.

स्वतःच स्वतःसाठी असणे,फार फार महत्त्वाचे आहे.मी जर स्वतःसाठीच नसेन,तर माझ्यासाठी कोण असणार आहे ? हिलील यांच हे जीवनतत्व मला पुस्तकांनीच शिकवले आहे.

इगो इज द् एनिमी – रॉयन हॉलीडे, इमोशनल इंटेलिजन्स – डॅनियल गोलमन, जग बदलणारे ग्रंथ – दीपा देशमुख,ह्युमनकाइंड – रूट्बर्ग ब्रेगमन,कुरल – सानेगुरुजी,सजीव – अच्युत गोडबोले, दगड – धोंडे–नंदा खरे,वारूळ पुराण–नंदा खरे,द सीक्रेट–रॉन्डा बर्न,चकवा चांदणं मारुती चितमपल्ली,द सेकंड सेक्स–सिमोन द बोव्हुआर,इसेंशियलिझम–ग्रेग मँकेआँन, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स–अच्युत गोडबोले, पाश्चात्तर राजकीय विचारवंत,शरीर,गन्स,जर्म्स अँड स्टील–जेरेड डायमंड,द पावर ऑफ पर्सिस्टन्स–जस्टीन सँच,द आर्ट ऑफ रिसायलेन्स–गौरांगदास,द गॉड डेल्युजन – रिचर्ड डॉकिन्स,सर्वोत्तम देणगी–जिम स्टोव्हँल,थिंक लाईक अ विनर–डॉ.वॉल्टर डॉयले स्टेपलस् अशाच अनुषंगाने मी पुस्तक वाचीत आहे.व शेवटपर्यंत वाचीत राहीन.

१९९६ साली मी शाळा सोडली.(मी ९ पास आहे.)अजूनही मला शाळेने सोडलेलं नाही. कोणत्या ना कोणत्या स्वरूपात मी शाळेशी व शाळा माझ्याशी जोडलेले आहोत. पुस्तकांनी मला जोडून ठेवलेले आहे.

तुमच्या वेदनेची दुःखाची जर तुम्हाला जाणीव होत असेल तर तुम्ही माणूस आहात तशीच दुसऱ्याच्या वेदनेची दुःखाची तुम्हाला जाणीव होत असेल तर तुम्ही जिवंत आहात. ही भावना संवेदना मला पुस्तकांनी दिली आहे.

जग बदलणारे ग्रंथ – दीपा देशमुख मनोविकास प्रकाशन या ग्रंथाचे पुस्तकांविषयी अनेक महत्त्वपूर्ण नोंदी केलेल्या आहेत.

तुम्हाला जर संधी मिळाली तर तुम्ही तुमची मुलं जाळून टाकाल,की तुमची पुस्तकं ?'असा विचित्र प्रश्न स्किनरनं त्याच्या पहिल्याच टेलिव्हिजनच्या कार्यक्रमात प्रेक्षकांना थेटपणे विचारला होता आणि इतकंच नाही,तर 'मी तर मुलांनाच जाळेन,कारण मानवी प्रगतीमध्ये माझ्या पुस्तकांमुळे माझ्या जीन्सपेक्षा जास्त योगदान मिळेल,'असंही त्या प्रश्नांचं स्वतःच सरळपणे उत्तरही दिलं होतं! अर्थातच त्याच्या या विधानावर प्रचंड गदारोळ झाला; बऱ्याच उलटसुलट चर्चाही झाल्या;

अलेक्झांडरचं स्वप्न तुर्कस्थानचा खलिफा उमर याच्यामुळे उद्धवस्त झालं असलं, तरी २००२ साली तिथल्या सरकारने त्याचं स्वप्न पूर्णत्वाला न्यायचं ठरवलं आणि पुन्हा बिब्लिओथेका अलेक्झांड्रिया या नावाचं एक मोठं ग्रंथालय उभं केलं.हे ग्रंथालय अतिशय भव्य असं असून एकूण १० लाखांवर पुस्तकं,सव्वा दोन लाख चौरस फुटांचा वाचन कक्ष,३ सभागृह, १ तारांगण,४ संग्रहालयं,४ कलादालनं,उपाहारगृहं, प्रदर्शनं आणि वेगवेगळ्या विषयांनुसार केलेले वेगवेगळे पुस्तकांसाठीचे असंख्य कक्ष असा अवाढव्य पसारा या ग्रंथालयात आहे.या ग्रंथालयात जाताना बरोबर गाईड घेऊन जाणं आवश्यक असून आत जाण्यासाठी प्रवेश तिकीट खरेदी करावं लागतं.अरेबिक, फ्रेंच आणि इंग्रजी या भाषेतली पुस्तकं जास्त प्रमाणात असून शिवाय जगातलं कुठल्याही देशातलं कुठलंही पुस्तक इथे तुम्हाला मिळण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात आहे. एकाच वेळी २ हजार वाचक बसून निवांत वाचन करू शकतील अशी

सुरेख रचना या ग्रंथालयात केली आहे.एखाद्या पंचतारांकित हॉटेलमध्ये गेल्याचा सुखद अनुभव या ग्रंथालयात गेल्यावर मिळतो.पुरातन काळात जिथे अलेक्झांड्रिया विद्यापीठ होतं,त्याच जागेवर हे ग्रंथालय उभारण्यात आलं आहे. या ग्रंथालयाच्या उभारणीत इजिप्शियन सरकार, फ्रेंच सरकार आणि युनेस्कोनेही आर्थिक मदत केली आहे.या सगळ्यांच्या मदतीने भव्य असं 'बिब्लिओथेका अलेक्झांड्रिया' हे ग्रंथालय आज दिमाखात उभं आहे.या ग्रंथालयात ८० लाख पुस्तकं ठेवण्याची सोय करून ठेवलेली आहे. १९४ देशांमधली पुस्तकं इथे बघायला मिळतात. त्या ग्रंथालयात पंडित जवाहरलाल नेहरू आणि महात्मा गांधी यांचीही पुस्तकं उपलब्ध आहेत. या ग्रंथालयाचं संगणकीकरण झालं असून इथे डिजिटल लायब्ररीचा विभाग देखील आहे. समजा,एखादं दुर्मिळ पुस्तक आपल्याला हवं असेल,तर अवघ्या पाच मिनिटांत तिथे असलेल्या प्रिंटरवरून ते हवं असलेलं पुस्तक मूळ पुस्तकासारखंच छापून त्या वाचकाला दिलं जातं हे विशेष!

बिब्लिओथेका अलेक्झांड्रिया' या ग्रंथालयात अंध व्यक्तींसाठी स्वतंत्र विभाग असून हजारो पुस्तकं ब्रेल लिपीत उपलब्ध आहेत. ऑडिओ स्वरूपातली पुस्तकं वाचण्यासाठी खास विभाग आणि बसायला आरामदायी खुर्च्या, हेडफोन्स अशी व्यवस्था वाचकासाठी केलेली आहे. एकदा वाचक ग्रंथालयात गेला,की तो सायंकाळच्या पाच वाजेपर्यंत कितीही वेळ आतमध्ये व्यतीत करू शकतो.या ग्रंथालयाची संपूर्ण इमारत वातानुकूलित असून वाचकाला टिपण काढण्यासाठी वही आणि पेन मोफत उपलब्ध

केले जातात.संगणकावर हव्या असलेल्या पुस्तकाची माहिती टाकताच,तिथले स्वयंसेवक हवी तेवढी पुस्तकं वाचकाला त्याच्या टेबलवर आणून देतात.'बिब्लिओथेका अलेक्झांड्रिया' सारखी ग्रंथालयं संपूर्ण जगभर निर्माण झाली, तर खरंच काय बहार होईल ?

ग्रंथालयांची जशी उभारणी झाली पाहिजे,तसंच प्रत्येक ग्रंथाची बांधणी चांगली,उत्तम दर्जाची होणं आवश्यक असतं.नाही तर पानं निखळतात आणि ग्रंथ नष्ट होतो.आजच्या भाषेत पुस्तकाचं बाइंडिंग नीट आणि पक्कं असायला हवं.पूर्वी कापडामध्ये घट्ट गुंडाळून ग्रंथ व्यवस्थित ठेवत. ते इतके घट्ट बांधलेले असत की,पाण्यात पडले तरी आतला कागद भिजत नसे.ग्रंथांच्या पानांना कसर लागू नये म्हणून त्यात सापाची कातण किंवा लिंबाची पाने ठेवत.म्हणून प्राचीन ग्रंथ हजारो वर्षे टिकले.थायलंडची राजधानी असलेलं बँकॉक हे शहर जगभरातल्या पर्यटकांसाठी आकर्षणाचं केंद्र आहे. मात्र या शहराचं वैशिष्ट्य असं की,या शहरात मोजकीच पण पुस्तकांची इतकी भव्यं दुकानं आहेत,की इथे भेट देणारा पुस्तकप्रेमी चकित होतो.इथे उपलब्ध असलेल्या पुस्तकांची मांडणी आणि सजावट इतक्या आकर्षक पद्धतीने केलेली आहे,की वाचकाला पुस्तका विकत घेण्याचा मोह व्हावा.पुस्तक शोधताना प्रत्येक पुस्तकाला खालून स्प्रिंग लावलेल असल्यामुळे तिथलं बटण दाबताच हवं ते पुस्तक समोर येतं.त्या पुस्तकाला अनेक वाचकांनी हाताळू नये,त्याचं

नवेपण अबाधित राहावं यासाठी ती व्यवस्था केली असून वाचक पुस्तक विकत घेण्यासाठी प्रवृत्त कसा होईल याची काळजी इथल्या दुकानांनी खूप कल्पकतेनं घेतली आहे.ही नाविन्यपूर्ण माहिती ऐकून मी थक्क झालो.

ज्या कुणाचं आयुष्य अतिशय साधं आहे,त्यांना समाधान नक्कीच मिळतं.आनंद मिळण्यासाठी आणि आनंद मिळवण्यासाठीही साधेपणा अत्यंतिक महत्वाचा आहे. हे दलाई लामा यांचे वाक्य जगण्याला उर्मी देऊन जातं. कारण आपण सर्वजण सुखी व समाधानी राहू शकतो.या धकाधकीच्या व धावत्या जगामध्ये,

आयुष्यामध्ये एवढाच एक शांततेचा विरंगुळा असेल तो ही स्वतःसाठी..

शेवटी जाता जाता..

प्रख्यात कवी गुलजार यांच्या एका सुरेख कवितेचा अनुवाद विजय पाडळकर यांनी केला, त्यात पुस्तकाशी हितगुज करताना गुलजार म्हणतात :

मित्राशिवाय सारा दिवस कसाबसा ढकलला स्वतःशीच अनोळखी असा
एकाकी,उदास
समुद्रकिनाऱ्यावर दिवस विझवून
मी परत इथेच आलो
निर्मनुष्य रस्त्यावरील रिकाम्या घरात
दरवाजा उघडताच
टेबलावर ठेवलेलं पुस्तक
हलकेच पान फडफडवीत म्हणालं
उशीर केलास,मित्रा!

दररोज मी पुस्तके वाचतो..
आणि स्वतःला' च शिकवतो.

पुस्तकातील हे वाक्य मला बरचं काही शिकवून जातं.

सर्वियन कादंबरीकार मिलोराद यांचे एक वाक्य आहे ते म्हणतात

'जोवर जगात पुस्तक वाचणाऱ्या वाचकांची संख्या बंदूकधारी सैनिका पेक्षा अधिक आहे तोवर काळजीच काहीच कारण नाही '

-९५५२१७७४७४

# वाचावी अशी...शंभर पुस्तके..!

**संजय भास्कर जोशी**

| अ.क्र. | पुस्तकाचे नांव | लेखकाचे नांव | अ.क्र. | पुस्तकाचे नांव | लेखकाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| ६०) | उत्सुकतेने मी झोपलो | श्याम मनोहर | ७३) | एका नृत्याचा जन्म | श्री.दा.पानवलकर |
| ६१) | रामनगरी | राम नगरकर | ७४) | पार्टनर | व.पु.काळे |
| ६२) | जागर | नरहर कुरुंदकर | ७५) | दिवसेंदिवस | शं.ना.नवरे |
| ६३) | सर्वोत्तम पिंगे | रवींद्र पिंगे | ७६) | बॅ.अनिरुध्द धोपेश्वरकर | भाऊ पाध्ये |
| ६४) | सखाराम बांइडर | विजय तेंडुलकर | ७७) | झाडाझडती | विश्वास पाटील |
| ६५) | युगांत | महेश एलकुंचवार | ७८) | आवडलेली माणसे | विद्याधर पुंडलिक |
| ६६) | एकेक पान गळावया | गौरी देशपांडे | ७९) | नागीण | चारुता सागर |
| ६७) | हंस अकेला | मेघना पेठे | ८०) | जेव्हा मी जात चोरली होती | बाबुराव बागुल |
| ६८) | ब्र | कविता महाजन | ८१) | मला उद्ध्वस्त व्हायचंय | मल्लीका अमरशेख |
| ६९) | चिरदाह | भारत सासणे | ८२) | आहे मनोहर तरी | सुनिता देशपांडे |
| ७०) | मारवा | आशा बगे | ८३) | ज्वाला आणि फुले | बाबा आमटे |
| ७१) | शाळा | मिलिंद बोकील | ८४) | नक्षत्रांचे देणे | आरती प्रभु |
| ७२) | महापुरुषांच्या नजरेतून स्त्री | मंगला आठल्येकर | ८५) | संध्याकाळच्या कविता | ग्रेस |

माझं वाचन

# एक समृध्द जाण



श्वेतल परब
सावंतवाडी


आपण वाचतो म्हणजे काय वाचतो आणि कशासाठी वाचतो? या प्रश्नाचं उत्तर द्यायचं झालं तर माहिती तंत्रज्ञानाच्या युगात थोडं संदिग्ध वाटेल असं उत्तर बाहेर पडेल. ते म्हणजे 'गरज म्हणून.' मी असं का म्हणते तर वाचन महणजे आजकाल केवळ वर्तमानपत्र वाचणं किंवा सत्य असत्याचा पडताळा न करता मेंदू काबीज करणाऱ्या सोशल मिडियावरील पोस्ट वाचणं एवढ्यापुरतं मर्यादित झालं आहे. काल माझी मैत्रीण मला म्हणाली, तुझ्याकडे खूप वेळ आहे गं वाचायला. आम्हालादेखील खूप आवड आहे, पण वेळच मिळत नाही. आम्हाला आमची रोजची कामंच संपत नाहीत.

मी म्हटलं, 'वाचन कधी ठरवून करता येत नाही. जेव्हा जेव्हा मोकळा वेळ मिळेल, तेव्हा तेव्हा पुस्तक बाहेर काढून वाचायचं. मोकळा वेळ म्हणजे अगदी घरातली भाजी साफ करताना असेल किंवा मुलांचा अभ्यास घेताना असेल. गृहीणींसाठी हाही वेळ मोकळा म्हणायला हरकत नाही. तिला माझं उत्तर पटलं की नाही माहीत नाही. 'प्रयत्न करते', म्हणत ती माझ्या समोरून निघून गेली. माझ्या कॉलेजमधील एक इंग्रजीचे सहकारी प्राध्यापक मला म्हणाले, मॅडम तुम्ही इंग्रजी पुस्तकं वाचत का नाहीत? तुम्ही इंग्रजी लेखन का करत नाही? तुमचं इंग्रजी चांगलं आहे, ते अधिक समृद्ध होईल. ते माझे सहकारी स्वत: मराठीची पुस्तकं वाचणं कमीपणाचं समजतात एवढंच नव्हे तर तर ते स्वत: कुठलंच पुस्तकं वाचताना दिसत नाहीत. पाठ्यपुस्तकातील धडे आणि कविता यावरदेखील ते कधी चर्चा करताना दिसत नाहीत. सांगायचं म्हणजे अपवादात्मक इंग्रजी पुस्तकं वगळता माझं मराठी पुस्तकांचं वाचन जास्त प्रमाणात असतं. तेही मराठी कथा, कविता, कादंबऱ्या, वैचारिक, लेख, लघुनिबंध, ललित यासारख्या साहित्यिक पुस्तकांचं वाचन मी करते. त्यात वैचारिक पुस्तकांचा भरणा जास्त असतो. कवितासंग्रहांचं' वाचन करताना मी ज्ञानेश्वरांचे अभंग ते अगदी तुकोबांपर्यंत तेवढ्याच आवडीने वाचते. संत कवयित्री जनाबाई, सोयराबाई, बहिणाबाई यांचे अभंग तर मला वेड लावतात. आधुनिक कवी केशवसुत. मर्ढेकर, गोविंदाग्रज, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी कुसुमाग्रज, विंदा करंदीकर,डॉ. भालचंद्र नेमाडे त्याचबरोबर विद्रोही कवी नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे यांच्या कविता मी तेवढ्याच आवडीने वाचते. मराठी साहित्यात आपला ठसा उमटवणाऱ्या मराठी कवयित्री बहिणाबाई, शांता शेळके, इंदिरा संत, गोदावरी परुळेकर, कविता महाजन, अनुराधा पाटील, निरजा, आसावरी काकडे, प्रज्ञा पवार यांच्या कविता माझ्या संवेदनशीलतेची दारं मोकळी करून देतात. मी काय वाचावं हा प्रश्न आज माझ्यासाठी गौण आहे. जे जे दिसेल ते वाचावे त्यातील शब्द टिपून घ्यावेत. जगण्याचं भान आणणारं साहित्य हेच आनंददायी साहित्य मग ते कुणी लिहिलं, का लिहिलं यापेक्षा ते आपलं विचारविश्व कसं समृद्ध करतं हे महत्वाचं आहे. वर्षानुवर्षे माणसाच्या मनाच्या गटारगंगेवर साचलेली घाण कुणी साफ केली असेल तर, ती पुस्तकांनी यासाठी पुस्तक वाचन हा एक

समृद्ध वारसा ठरू शकतो. मी लहान म्हणजे पाचवीत असताना, माझी आजी एकनाथी भागवत वाचत होती. त्यातल्या कथा ती मला रंगवून रंगवून सांगायची. माझे आजोबा तर संत साहित्यावर नेहमी घरात मोठ्या आवाजात प्रवचन स्वरूपात बोलत असतं. कुणी ऐकू दे की नको त्यांचं बोलण सुरू असायचं. कदाचित तेव्हाच माझ्या वाचनाची बिजभरणी झाली असेल. आध्यात्मिक वाचनाकडून माझा सुरू झालेला प्रवास हा वैचारीक वाचनापर्यंत कसा येऊन पोहोचला हे आता नेमकेपणाने सांगणे कठीण. कदाचित काही साहित्यिक मित्रपरिवारातून अशा प्रकारची माझी जाण समृद्ध होत गेली असावी. कॉलेजच्या काळात वि. स.खांडेकरांच्या साहित्यावर अफाट प्रेम करणारी मी, डॉ. भालचंद्र नेमाडे, सदानंद देशमुख या वास्तववादी, देशी कादंबऱ्या लिहिणाऱ्या लेखकांच्या वाचनाकडे कधी वळले मला कळलं नाही. एकूणच वाचनाला कुठलीच एक सीमारेषा आखता येत नाही. लेखन करताना काही संदर्भ लागतात महणून काही पुस्तकं मुद्दाममहून खरेदी करून वाचावी लागतात. उदा. स्त्रियांच्या प्रश्नावर लिहायचं म्हटलं तर पूर्वीच्या स्त्रियांनी केलेलं लेखन आणि समकालीन लेखन याचा तुलनात्मक अभ्यास मनातल्या मनात घोळवावा लागतो. त्यासाठी स्त्रीवादी साहित्यात नावाजलेली पुस्तकं वाचावी लागतात. एकूणच साहित्यवाचन आणि लेखन ही अव्याहत चालणारी प्रक्रिया आहे. आता आपण जो मराठी भाषा पंधरवडा साजरा करतोय. तोही ज्या राज्याची मातृभाषा मराठी आहे तिथे साजरा करावा लागतोय, म्हणजे आपलं मातृभाषेच्या पंगतीतलं बसणं किती कमी झालं आहे हे आपल्या लक्षात येईल. परदेशात जाऊन आपण इंग्रजी पंगतीत बसतो. पण आपल्या देशात मराठी पंगतीत बसणं, आपल्याला कमीपणाचं वाटतं. आपली ओळख ही भाषेवरून नक्की होते. पण आपली भाषा कोणती आहे, यापेक्षा ती किती समृद्ध आहे यावरूनही आपली ओळख ठरली जाते. मी या लेखात सगळ्या लेखक कविंचा उल्लेख केलेला नसला तरी आध्यात्मिक, वैज्ञानिक, मनोरंजनपर, माहितीपर आणि वैचारिक पुस्तकं लिहिणाऱ्या सगळ्या लेखकांनी मराठी साहित्यात तेवढीच भर घातलेली आहे म्हणूनच आपली मातृभाषा अधिकाधिक समृद्ध झाली आहे. तो साठा बाहेर काढण्यासाठी वाचन महत्वाचे आहे. एकदा पु.ल.देशपांडे म्हणाले,माणसाला जेवणावरून उठवले तरी चालेल पण वाचन करताना उठवता कामा नये.यावरून वाचन ही माणसाची मुलभूत गरज आहे हे लक्षात येतं. जशी तहान आणि भूक या शरीराच्या नैसर्गिक गरजा असतात तशीच वाचन ही एक माणसाची मानसिक आणि बौद्धिक भूक आहे.ज्येष्ठ साहित्यिक डॉ.अनिल अवचट म्हणतात, प्रत्येक व्यक्तीमध्ये काहीतरी चांगले दडलेले असते, परंतु पैसा आणि उपभोगाच्या दडपणाखाली तो गेलेला असतो. वाचनाची गोडी लावणारी बाह्य आकर्षणे निर्माण करावी लागतात. आईवडील हे आपण पहिले गुरु मानतो. ते आपल्या मुलांना वाचनाची गोडी लावतात. त्यानंतर शाळेतील गुरु हे विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रेरणा देतात. तरीदेखील अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील एवढीच मुले वाचन करताना का दिसतात? किंवा हीच मुले पुढे मोठी झाल्यावर वाचन करताना का दिसत नाहीत? मला वाटतं जे जे शिक्षक किंवा प्राध्यापक आहेत त्यांनी स्वत: वाचन वाढवलं पाहिजे आणि विद्यार्थ्यांना त्यातील काही भाग वाचून दाखवणं किंवा सांगणं एवढं केलं तरी नक्कीच हा वाचनाचा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होईल.

-९४२३३०१८९२

# बहारदार देशाचं अंतरंग...




डॉ.विवेक पाटकर
पुणे

'सप्तरंगी कोरिया - एक अनुभव', हे डिसेंबर २०२२ मध्ये ग्रंथालीनं प्रकाशित केलेलं सुधा हुजूरबाजार-तुंबे लिखित पुस्तक हाती आलं आणि वाचता वाचता ते कधी संपलं, हे समजलंच नाही. याला अर्थातच अनेक कारणं आहेत. त्यातील एक मुख्य म्हणजे हे धावतं प्रवासवर्णन नसून सुमारे सात वर्ष (जुलै २०१३ ते डिसेंबर २०१९) दक्षिण कोरियात राहून, तेथील भाषा शिकून, विविध स्तरातील व्यक्तींशी मिळून-मिसळून प्रत्यक्ष जाणवलेली त्या देशाची सर्वांगीण ओळख देण्याचा स्तुत्य प्रयत्न आहे. दुसरं आहे ते या देशाच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक बैठकीची आपल्याला असलेल्या त्रोटक माहितीची कमतरता दूर होणं. दक्षिण कोरिया हा देश काही दशकांतच प्रगत देशांत का गणला जाऊ लागला या प्रश्नाच्या उत्तरादाखल पुस्तकात दिलेली कारणमीमांसाही आपल्याला अंतर्मुख करून विचार करण्यास भाग पडते हे विशेष. लेखिकेनं इंद्रधनुष्याचे सात रंग (तांनापिहिनिपाजां) हा धागा पकडून प्रत्येक रंगाचे वैशिष्ट्य दक्षिण कोरियात तिला कसे अनुभवास आले या प्रकारे केलेली मांडणी पुस्तकाच्या शीर्षकाशी अनुरूप आहे. थोडक्यात, तांबडा हा सुरक्षा, शिस्त व स्वच्छता, नारिंगी हा उत्साह, जिद्द व संतुलन, पिवळा हा मैत्री, ज्ञान व सहिष्णुता, हिरवा हा पर्यावरण, संवृद्धी व सुपीकता, निळा हा भव्यता, एकनिष्ठता व आत्मविश्वास, पारवा हा कर्तव्यदक्षता, मानवतावाद व आत्मसम्मान आणि जांभळा हा संपन्नता, महत्त्वाकांक्षा व स्वातंत्र्य असे दर्शवणारे रंग दक्षिण कोरियातील वास्तव्यात कसे दिसले याचे परिपूर्ण वर्णन इथं आढळतं. त्यामुळे तेथील रम्य निसर्ग, विविध ऋतूंतील बदल आणि त्यांच्याशी निगडीत सण व उत्सव, परंपरा, कुटुंब व्यवस्था, ग्रामीण आणि शहरी जीवनातील फरक, मैत्रीभाव, आदरातिथ्य,



खाद्यसंस्कृती यांचे अथांग दर्शन मिळते. त्याच बरोबर जाज्वल्य देशाभिमान, आपल्या भाषेतून शिक्षण आणि तिचा कटाक्षाने वापर, वेळ व कामाची गुणवत्ता याची कदर आणि कुठलीही पळवाट न शोधता नियमाप्रमाणे वयाच्या विसाव्या वर्षानंतर किमान दोन वर्ष कोरियन सैन्यात सक्तीची राष्ट्रसेवा करण्यासाठी उत्सुक असलेली मुलं, यात त्या देशाच्या भरभराटीचं रहस्य दडलेलं असून पुस्तकात दिलेल्या कित्येक उदाहरणांनी ते पुढे आलेलं आहे. लक्षात घेण्याची बाब म्हणजे लेखिकेनं दक्षिण कोरियाच्या काही मर्मांची चर्चा देखील पुस्तकात केली आहे. महागडं शिक्षण आणि




नोकरीसाठी जीवघेणी स्पर्धा या बाबी पुढे आलेल्या आहेत. मात्र त्यामुळे कुठलेही काम कमी दर्जाचे आणि ते करण्यात कमीपणा लोकांना वाटत नाही हे आढळतं. बाह्यसौंदर्याला अवास्तव महत्त्व आणि चंगळवाद म्हणजे चैनीच्या वस्तूंवर वारेमाप पैसा खर्च करणं या खटकणाऱ्या गोष्टींचा उहापोह निर्भीडपणे पुस्तकात केलेला आहे. या पुस्तकाच्या निमित्तानं इतरही काही महत्त्वाच्या गोष्टी पुढे आलेल्या आहेत. आयुष्यात मार्ग काढून समाधान देणारं कार्य करत राहाणं हे प्रस्तुत करणारी पुस्तकाची बाजू देखील दाखल घेण्याजोगी आहे. लेखिकेचे पती यांची दक्षिण कोरियातील नोकरीत नियुक्तीनंतर त्यांच्यावर अवलंबून म्हणून काम न करण्याचा व्हिसा मिळालेल्या लेखिकेनं थोडी वेगळी वाट चोखाळली. वयाच्या पन्नासाव्या वर्षी आव्हान स्वीकारून शिकलेल्या कोरियन भाषेचा उपयोग दक्षिण कोरियातील विविध सामाजिक क्षेत्रांत स्वयंसेवक म्हणून योगदान करण्यात केला हे नमूद करणं गरजेचं आहे. त्याचा एक भाग म्हणजे लिहिण्या-वाचण्याची अकार्यक्षमता असणारे विद्यार्थी आणि त्यांचे पालक ह्यांना मदत करण्यासाठी स्थापित 'कोरिया डिस्लेक्सिया असोसिएशन' या संस्थेत आठवी ते दहावीच्या मुलांना लेखिकेनं परिश्रम घेऊन कोरियन भाषेतून गणित शिकवणं आणि तेही विनामूल्य, याचं कौतुक वाटतं. लेखिका स्वतः वाणिज्य शाखेतील स्नातकोत्तर पदवीधर आहेत, पण प्राध्यापक मो. शं. हुजूरबाजार या त्यांच्या सुप्रसिद्ध गणिती वडिलांकडून लहानपणी शिकलेल्या गणिती शिदोरीचा त्यांनी कल्पकतेनं वापर केल्याचं अप्रूप आहे. तसेच, दक्षिण कोरियाच्या राजधानी सेऊल येथील पोलीस मुख्यालयाकरिता 'परदेशी नागरिकांसाठी मदतनीस स्वयंसेविका' म्हणून सुमारे तीन वर्ष काम करून भारताची प्रतिष्ठा वाढवण्याचं श्रेय देखील लेखिकेला जातं. त्यासाठी मिळालेलं मानपत्र व ट्रॉफी हा सन्मान कटाक्षानं भारतीय साडी या पोशाखात स्वीकारतानाचं चित्र मनावर कोरून जाणारं आहे. त्याचसोबत भारतीय भूगोल, इतिहास, संस्कृती आणि खाद्यपदार्थ यांची ओळख जमेल त्या मंचावरुन सादर करून एकाप्रकारे राजदुताची भूमिकाही तिने बजावली आहे. तरी हे विविध अंगांनी व रंगांनी भरलेलं जगभरातील समस्त मराठी वाचकवर्गाला समर्पित ... अशी अर्पणपत्रिका असलेलं १५० पानी पुस्तक मुळातून वाचणं हा एक आनंददायी अनुभव आहे, आणि तो सर्वांनी घ्यावा आणि इतरांना द्यावा हीच लेखिकेच्या कामाची पावती म्हणता येईल.

**(डॉ. विवेक पाटकर, हे गणितज्ञ व स्वतंत्र संशोधक आहेत आणि मराठी विज्ञान परिषदेच्या कार्यकारी समिती आणि तिच्या मासिक पत्रिकेच्या संपादक मंडळाचे सदस्य आहेत.)**


vivekpatkar03@gmail.com

# कालचक्र



सारीका रंधे
शिरपूर-धुळे

अत्यंत प्रतिभासंपन्न सुप्रसिदध लेखक पत्रकार अरुण टिकेकर यांचे दर्जेदार कालचक्र या ललीतगद्य पुस्तकाचा वाचनानंद काही औरच आहे.प्रत्येकाने आवर्जून वाचावे व संग्रही ठेवावे असे  हे पुस्तक.मित्रांनो कुणीतरी म्हटलेच आहेवाचन हे असे एकमेव व्यसन आहे ज्यामुळे मनुष्य वाचतो.कारण पुस्तकाचे साहित्यमुल्य असते.मुल्य म्हणजे पैशात केलेली किंमत नव्हे! तर पुस्तकातील आशय वाचकाला दिशादर्शक ,कथाकथन शैली ,ज्ञानप्रबोधन,शब्दसंग्रह ,गुणग्राहकता,मनोरंजकता, सकारात्मकता,विवेकाबरोबरच वास्तवाचे भान व लेखकाची संशोधनात्मक भुमिका प्रदान करणारा आहे यावर त्याचा दर्जा अबलंबून आहे.जे जे आपणासी ठावे ते इतरांशी सांगावे शहाणे करून सोडावे सकळ जन आपल्या समृद्ध अशा साहित्यपरंपरचा ठेवा अधिकाधिक समृद्ध करून रसीक वाचकांपर्यत द्यावा असेही लेखकाचे उद्दिष्ट असते.कालचक्र म्हणजे काही परीकथेसारखं , गुढं ,पौराणिक कथेसारख वाटत असले तरी या नव्य युगाच्या कालचक्राचे वर्णन आले आहे.कालचक्र  यात अरुण टिकेकर यांनी सामाजिक ,सांस्कृतिक आणि साहित्यिक विश्वावर केलेलं मार्मिक भाष्य  होय! संवादात्मक शैलीचा वापर यातून त्याची व्यापकता,वाड:मयीन मुल्य समजते.नवीन अनेक शब्दांचा ,सुविचारांचा जसे अप्रामाणिकपणा करण्याच्या पहिल्याच मोहाला दूर ठेवणे म्हणजे चारित्र्य परीचय होतो.  या ललीतगद्यात एकुण ८१ प्रकरण आहेत. बाबू पार्लमेंट या प्रकरणात India in १९८३ हे पुस्तक ब्रिटीश लेखक टी.हार्ट डेव्हीस यांनी लिहेलेले यावर ब्रिटीशांनींच बंदी घातली होती कारण भारत देश उठाव करून १८८३ साली ब्रिटीश मायदेशी परत जातील अशा आशयाची कहाणी लिहीतो. भारताच्या




विशाल सामर्थ्याचे वर्णन करणारे व शिरपेचात मानाचा तुरा

रोवणारे आणखी एक उल्लेखनीय म्हणजे दिल्लीने आघाडी घेतली ,मुंबईचे काय? यात युनेस्कोने दिल्लीला ग्रंथप्रसाराच्या कार्याबददूल महानगरांचा ग्रंथचळवळीची जागतिक राजधानी अशा किताबाने सन्मान करण्याची सुरू केली.तदनंतर हॅरी पॉटर या जगप्रसिद्ध पुस्कताच्या लेखिका जे.के.रोलींग यांनी दुसऱ्या लेखकावर स्वामित्वहक्कासाठीची लढाई व त्यांना मिळालेला न्याय यांची कथा सुरस आहे.फिरकी गोलंदाजांपुढे आव्हान बदलत्या जीवनशैलीचा क्रिकेटजगतावर होणार परिणाम व यात बॉलर ची व्यथा मांडली आहे.त्यांच्या फिरकीचाी नजाकत व कौशल्य याला न्याय मिळत नाही यावर मार्मिक भाष्य केले आहे., तसेच कपील देव ला ब्रँड म्बेसेडर करण्याच्या निमित्ताने दिलेली मर्सिडीज व उस्ताद बिसमिल्ला खान यांच्या विषयी परखड विचार मांडले आहेत. भीष्म साहनी या हिंदी साहित्यिकाची भेट व सानिध्य त्यांचे व्यक्तिमत्वावर पडलेला प्रभाव कथन केला आहे.आस्ट्रेलियाचा बॉलर शेन वॉर्न याची गगनाला भिडलेली प्रसिद्धी पण त्याने केलेली मॅच फिक्सींग केलेल इतर गुन्हे यावर परखड विचार मांडले आहेत.अशा देश विदेशाची सफर लेखक आपल्याला घडवतात व चोखंदळ वाचकाला खिळवून ठेवतात.कालचक्र नावाप्रमाणेच काळाची पाउले ओळखून अनोखी सफर घडवणारे ललीतगद्य होय! वाचनलेखनाचा त्यांचा प्रपंच त्यांचा दांडगा व्यासंग या पैलूचे दर्शन घडते.गाढे अभ्यासक ,संशोधक ,वृत्तपंत्राचे संपादक लेखक आणि ग्रंथप्रेमी असे बहुआयामी व्यक्तीमत्व असलेल्या डॉ .अरूण टिकेकर यांचे समाजमनात घडत असलेल्या बदलांकडे ,वृत्ती -प्रवृत्तींकडे किती सुक्ष्म निरीक्षणक्षमता होती याची साक्ष देते. एखाद्या जेष्ठ आणि अभ्यासू मित्राने सहज गप्पा माराव्यात ,आपल्याला उमललेलं काहीतरी सांगावं अशी या लेखमालेची ओघवती शैली आहे.लेख आपल्याला अंतर्मूख करतात.डोळ्यात झणझणीत अंजन घालतात.नव्या -जुन्या विषयांची सांगड घालत परखड समीक्षण करतात.

-९८५०२४७१२२

## वाचावी अशी...शंभर पुस्तके..!


**संजय भास्कर जोशी**

| अ.क्र. | पुस्तकाचे नांव | लेखकाचे नांव | अ.क्र. | पुस्तकाचे नांव | लेखकाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| ८६) | रानातल्या कविता | ना.धो.महानोर | ९६) | कॅलिडोस्कोप | अच्युत बर्वे |
| ८७) | रसयात्रा | कुसूमाग्रज | ९७) | थॅक्यु मिस्टर ग्लाड | अनिल बर्वे |
| ८८) | संहिता | विंदा करंदीकर | ९८) | निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी | ह.मो.मराठे |
| ८९) | चित्रलिपी | वसंत डहाके | ९९) | पंचतारांकित | प्रिया तेंडुलकर |
| ९०) | जिप्सी | मंगेश पाडगांवकर | १००) | जाहिरनामा | नारायण सुर्वे |
| ९१) | ऑर्फियस | दिलीप चित्रे | | | |
| ९२) | निशाणी डावा अंगठा | रमेश इंगळे उत्रादकर | | | |
| ९३) | काळा सुर्य आणि हॅट घालणारी बाई | कमल देसाई | | | |
| ९४) | निजधाम | रत्नाकर मतकरी | | | |
| ९५) | मिरासदारी | द.मा.मिरासदार | | | |

साभार लोकराज्य

## आवर्जून वाचावी अशी पुस्तके

नोंद घेण्याजोगं!






**रेणुका महेश**

पुणे

भूक लागली की आपण जसे जेवतो आणि आपली भूक भागवतो तसेच मनाची भूक आणि वाचकांची भूक भागवण्यास जे लागते ते म्हणजे पुस्तक! माणसाने एक तरी पुस्तक आयुष्यात वाचावे आणि ते जर मनापासुन वाचले तर आपण नक्की त्याच्या प्रेमात पडतो. ते आपल्या प्रेमात अगदी सामावून घेत. अगदी प्रत्येक प्रश्नाचं उत्तर म्हणजे पुस्तक आहे. माणसाचा सच्चा मित्र म्हणजे पुस्तक. आपला एकटे पणा दूर करणं म्हणजे पुस्तक.ज्ञान मिळण्याचे साधन म्हणजे पुस्तक. एका ठिकाणी राहुन विश्वभ्रमण करता येण्याजोगं काही विश्वासू वाहन म्हणजे पुस्तक. कोणाच्या ही घरी गेलं की सर्वांत आधी मी शोधत असते ते म्हणजे पुस्तकाचे कपाट किंवा कोपरा आणि त्या पुस्तकांमधुन ती व्यक्ती आणि त्याचा स्वभाव ही कळतो. अशी ही पुस्तकं आपल्याला बरंच काही सांगून जातात. पुस्तकाने भरलेलं घर म्हणजे सोन्याने सजलेल देवालय जणू आणि अशा काही पुस्तकांची यादी मी या लेखा मार्फत मी सांगणार आहे.वि.स.खांडेकर हे एक थोर लेखक. नावातच सगळे आले. मनावर पकड घेणारे लक्षवेधी शब्द आणि मन एकग्रह करून टाकणारे लेखन मन हेलवून जाते. प्रत्येक माणसाने त्यांचे एक तरी पुस्तक नक्की वाचावे आणि आपल्या आयुष्यात बदल घडवून आणावा. माझ्या आवडीची काही पुस्तकं. त्यांनी सगळ्या विषया सदंर्भात लेखन केले आहे.मराठी साहित्यांत त्यांचे नाव खूप आदराने घेतले जाते. त्यांनी अनेक कथा,कादंबरी,काव्य,नाटक,निबधं,पटकथा,समीक्षा, विनोद इ. साहित्य क्षेत्रात त्यांचे खुप मोठे योगदान आहे. त्याचे व्यक्तिमत्व ऋषितुल्य आहे. हिरवा चाफा, ययाति, अमृतवेल, पहिले प्रेम, सुखाचा शोध, मंदाकिनी, मखुवटे, हिरवळ ही काही निवडक पुस्तके आहेत. मला खात्री आहे की तुम्ही एक वाचायला घेतले की वाचतच राहाल....

explorekidsworld@gmail.com

नोंद घेण्याजोगं!

# संघर्ष एका आईचा...नौदलाशी!





**पुष्पा सुरेश पाटील**

तुर्भे,नवी मुंबई


अलीकडेच ‘संघर्ष एका आईचा... नौदलाशी’ (नवचैतन्य प्रकाशन) हे अनुराधा पळधे लिखित पुस्तक वाचनात आलं. अनुराधा पळधे ह्या मूळच्या शिक्षिका. त्यांचा थोरला मुलगा अमर म्हणजे अष्टपैलू व्यक्तिमत्व. अभ्यासात सर्वसामान्य पण, खेळांमध्ये नैपुण्य असणारा अमर देशसेवेची उद्दीष्टाने स्वकर्तुत्वाने नौदलात दाखल होतो आणि कारकीर्द बहरत असतानाच त्याचा गूढ मृत्यू होतो. त्या गूढ मृत्युच्या शोधाकरिता केलेल्या अथक संघर्षांची कहाणी म्हणजे हे पुस्तक.

हे आत्मानुभव प्रत्येक पानात वाचताना आसवांची गर्दी होते. त्यांनी गोष्टीरूपाने केलेली मांडणी अंतःबाह्य हेलावून टाकणारी आहे. त्यांच्यावर झालेला आघात शब्दांकित करताना त्यांच्या मनाची काय अवस्था झाला असेल हे पानोपानी जाणवत राहतं. आपल्या पोटच्या गोळ्याचे झालेले हाल एक आई म्हणून विषण्ण करुन टाकतं. त्यांच्यावर झालेल्या अन्यायाला त्यांनी दिलेल्या लढ्याला तोड नाहीच. नौदलासारख्या एका भक्कम तटबंदीला समर्थपणे संपूर्ण ताकदीनिशी दिलेल्या प्रहारामुळे अमरवर झालेल्या अन्यायाला थोड्याफार प्रमाणात न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. नौदलाच्या बेफिकिरी आणि अनागोंदी कारभारामुळे लेखिकेच्या सहनशक्तीने परिसीमा गाठूनसुद्धा त्यांनी दिलेल्या लढ्याला माझा सलाम!

हा अन्याय पुस्तकरूपाने सर्वांसमोर मांडताना लेखिका पुन्हा एकदा आपल्या लेकाचं बालपण जगल्याचं लक्षात येतं, ते इतकं की हे प्रसंग काल-परवाच घडल्यासारखे टवटवीत वाटतात. ह्या आत्मकथनामध्ये आपला धाकटा मुलगा प्रताप याच्यावर एक आई म्हणून अन्याय केल्याचे लेखिकेने स्वतःच कबूल केले. त्याचवेळी सौ. पल्लवी (प्रतापची अर्धांगिनी) हिची ह्या लढ्यात भक्कम साथ मिळाल्याचेही आवर्जून नमूद केले आहे. खरंतर पल्लवीचंही कौतुक करावं तेवढं थोडंच, कारण अमरला तिने फक्त फोटोतच पहिलं असेल आणि त्याचयाबद्दलची माहिती तिला प्रताप आणि सासूबाईंकडून मिळाली असेल.




आपल्यावर बेतलेल्या प्रसंगावर सर्वसामान्य माणसाने कसे लढावे, यादृष्टीने हे पुस्तक प्रेरणादायी आहे.हे पुस्तक वाचल्यावर माझी लेखी प्रतिक्रिया जेव्हा पळधेबाईंना कळविली, तेव्हा त्या ‘माऊली’ने स्वतः फोन करून त्या पत्राची पोच दिलीच, पण मला त्यांना आवर्जून भेटण्याचे आमंत्रणही दिले.


-८७७९६१८०४३

नोंद घेण्याजोगं!

# शेतकऱ्यांच्या आर्त बाह्य कल्लोळांचा आत्महुंकार...कैवार



**युवराज पवार**
शिरपूर-धुळे

'कैवार' हा डॉ.शिवाजी नारायणराव शिंदे यांचा पहिलाच कवितासंग्रह,शब्द शिवार प्रकाशन, मंगळ वेढा येथून १ ऑगस्ट २०२०मध्ये प्रकाशित झालेला.या कवितासंग्रहात एकूण...४४ कविता आहेत.या साऱ्या कविता आशय संपन्न आहेत. अर्थ छटांचे विविध पैलू,सरस अभिव्यक्ती ,साधी सरळ मितभाषी कवीचे सूक्ष्म आत्मचिंतन, अचूक निरीक्षण,विषयभान,प्रतिमा प्रतीकांचा मुक्त वावर , शेतकऱ्यांसह, त्याचा सारा भवताल,निसर्ग, नदी, डोंगर, आडते, मापारी, दलाल, सामजिक, राजकीय, गोत गणगोत,आप्त स्वकीय,परकीय नाते संबंध टिपणारा हा कवितासंग्रह आहे. शेतकऱ्यांच्या व्यथा मांडणारे, समर्पक शीर्षक, आकर्षक, मनोवेधक मुखपृष्ठ, डॉ राजेंद्र दास यांची अनुरूप प्रस्तावना, आतील सुंदर रेखाटन, मलपृष्ठवरील नागराज मंजुळे यांचा सालस मजकूर या मूल्यगुण वैभवांमुळे ही कविता वाचक रसिकांच्या मनाचा ठाव घेते.यात कुठलीही शंका नाही.हा त्यांचा पहिलाच कवितासंग्रह त्यांच्या कवीपणाची साक्ष देणारा आहे...शांत संयमी स्वभाव,मोकळ्या मनाचा दिलदार हा कवी मनाचा माणूस आहे.कैवार मधली कविता त्यांची आपली आहे.ती कोणाच्या अनुकरणातून येत नाही. ती आपली पायवाट स्वतः निर्माण करते.समोर च्या वास्तवाला आपल्या कवेत घेते.त्याचे सूक्ष्मचिंतन करते.ती उगाच बडेजाव पणा आणत नाही. ज्वलंत वास्तव अनुभव हे तिचे उगमस्थान आहे. ती आपल्या नादात वाहत येते.तिचा घाट नैसर्गिक आहे.रांगडेपणा तिच्या मुळातच भिनल्याने तिला आपला खास स्वतःचा असा चेहरा लाभला आहे.तिची एक वेगळी ओळख तिने आपल्या या वेगळ्या स्वभाव, गुणधर्मामुळे, बेडरपणामुळे निर्माण केली आहे.सत्य,सौंदर्य या मूल्यांची ती जोपासना करते..सत्याच्या तेजाने प्रज्वलित झालेली ही कविता शेतकऱ्याच्या सुख दुःखाचे,त्याच्या शोशिकपणाचे, त्याच्या आशा निराशांचे,त्याच्या कष्टमय जीवन भवतालचे क्षितिज उभे करते.,हे या कवितेचे आत्मिक अलंकरण आहे. जगाचा पोशिंदा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, शेतकऱ्यांची,त्याच्या घामेजल्या दुःखांची, त्यांच्या हीन कर्माची व्यथा सांगणारी...आणि त्या व्यथांवर हळुवार फुंकर घालणारी ही कविता...कवीच्या स्वानुभवातून येते.शालेय शिक्षण घेत असताना स्वतः च कवी शेतात राबलेला आहे. शेतीभाती निसर्ग,डोंगर नदी, दगड माती सुकाळ,दुष्काळ,यांसारखी परिस्थिती स्वतः कवीने अनुभवली आहे.ही कविता म्हणजे त्यांच्या जीवन जगण्याच्या अनुभवातून आलेली आहे. तिऱ्हाईपणा म्हणून कुठे काही आढळत नाही. अहिल्याबाई होळकर विद्यापीठात क्लास वन च्या हुद्द्यावर असलेले डॉ शिवाजीराव शिंदे यांची नाळ शेती मातीशी घट्ट जुळलेली आहे.याची ग्वाही या कविता देत राहतात.साऱ्या जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी आज कोणत्या अवस्थेतून जात आहे.त्याच दुःख कोणी कानावर घ्यायलाच तयार नाही. अस्मानी सुलतानी संकटांनी तो पिचला आहे.त्याच्या भाळी सदैव आरिष्ट्य दारिद्र्य,निराश्य कोरले गेले आहे. नैराश्येच्या गर्तेत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या आत्म हत्या थांबायलाच तयार नाहीत...सदैव उन्हातानात घाम गाळणाऱ्या शेतकरी माणसाच्या जीवनाची कैफियत मांडणारी ही कविता शेतकऱ्यांना ही चांगले दिवस येतील असा आशावाद व्यक्त करते. शेतकऱ्यांना दिलासा देते.त्यांच्या पाठीशी उभी राहून त्यांना झुंजायला लढायला शिकवते.त्यांच्याशी संवाद साधते.हे या कवितेचे अंगभूत गुणवैशिष्ट्ये आहे.....'बाप

नावाचा माणूस' या पहिल्याच कवितेत शेतकरी बापाची ,त्याच्या औदार्याची,त्याच्या अपमानीत, तिरकृत जीवनाची ,कर्म कहाणीचीच तोंड ओळख कवी करून देतात.' मुलांचं शिक्षण अपूर्ण राहू नये म्हणून प्रसंगी सावकाराकडून कर्ज काढणारा, भाव-भावकीकडून,नाते वाईकाकडून क्षणो क्षणीहोणारा अपमान सहन करणारा बाप पाहिला मी '( बाप नावाचा माणूस पृष्ठ.१९) हे शेतकऱ्याच जीवन आहे.त्याच्या उरी जन्माला आलेल्या पोराचं हे अनुभव आहे.गरीबी नादारीन पिचलेला शेतकरी बाप आपल्या पोरांना शिक्षण मिळावं त्यांच्या जीवनाची,आयुष्याची परवड, लातडी होऊ नये याचसाठी हा शेतकरी बाप आपल्याच भावकी नात्यातील माणसाकडून मदत मागतो प्रसंगी अपमानित, तिरस्कृत होऊन शेवटी सावकाराकडून कर्ज काढून पोरांना शिकवतो. एका शेतकऱ्याच्या जिद्दीचे त्याच्या चिकाटीचे करुण दुःखच ही कविता अधोरेखित करते 'माझा शेतकरी बाप' या कवितेतून कवी डॉ शिवाजीराव शिंदे भारतातील एका निष्ठावंत, सत्याची कास धरणाऱ्या ,इमाने इतबारे जपणाऱ्या कणखर, व आपल्या मुलाबाळांना उच्च कोटीचे मूल्यशिक्षण देणाऱ्या शेतकरी बापाची खऱ्या अर्थाने अनभिज्ञ जगाला ओळख करून देतात....'बाबा' तुम्ही कष्टातच जगता कष्टाताच मरता याच कोणालाच काही नाही इथं शिरजोरच पुढे आहे कष्टकऱ्याचं काहीच नाही...(पृ. क्र.२९) शेतकरी साधा,भोळा स्वाभिमानी राहिल्यामुळेच की काय त्याच्या दुःख कष्टांना, हाल अपेष्टाना येथे काहीही मोल नाही.शेतकऱ्यांच्या बळावर जगणारीच येथे शिरजोर झाली आहेत. इमानदार उपाशी मरत असून बेईमान मात्र मजेत जगतो आहे. लबाड लूच्चे खऱ्याचं खोटं आणि करून आरामात जगत आहेत.परंतु आपल्या शेतकरी बापाच्या वागण्या जगण्यात, कष्टा कुठलीही खोट नाही.म्हणूनच त्याच्या पदरी अशी दैन्यावस्था आली आहे.हे ओळखून कवी समग्र शेतकऱ्यास पेटून उठण्याचा क्रांतिकारी सल्ला देतात. पेटून उठल्याशिवाय येथे काहीच मिळणार नाही. हक्कासाठी लढणे, अन्याय, अत्याचाराचा,प्रतिकार करणे,हा नीति मूल्याचाच एक भाग आहे. हे ठामपणे कवी नोंदवतो.हे अनुभव स्वतः कवीचे असल्यामुळेच ते सरळ हृदयातून येते. तिऱ्हाईतपणाचा कुठलाही अंश या कवितेत येत नाही. ती त्यांच्या जगण्यातून आली आहे.या खेरीज ' 'जगाच्या पोशिंद्यान कसं जगावं,' शेतकऱ्यांच्या जगण्याचे वांदे,''शेतकऱ्यांचे दुःख,पोरीच लगीन, सांग माझ्या सरकारा,' हुलकावणी,अवकाळी पाऊस, यासारख्या कवितेतून शेतकऱ्यांच्या आत्मिक कल्लोळाचा हुंकार कवीने सशक्तपणे कवितेतून टिपला आहे. आईची प्रतिमा अनेक कवींनी आपल्या कवितेतून साकारली आहे.मग शिवाजीराव शिंदे कसे बरे मागे राहतील.त्यांच्याही कवितेत आई ही प्रतिमा अवतरते.शेतात केवळ बापच कष्ट करत नाही तर त्याच्या खांद्याला खांदा देत कवीची आईही राबते.तिचे कष्ट देखील अपार आहेत.या सत्याची देखील कवी तेवढ्याच आत्मियतेने नोंद घेतो.' राब राब राबते घास आम्हास भरवते I मात्र उपाशी राहते माझी आई (माझी आई पृष्ठ ३१) शेतकरी स्त्री ही अगदी काटकसरीने आपला संसार सांभाळते.पोरांना जपते.काळजी घेते. वेळप्रसंगी उपासी राहते.मायाळू, संस्कारशील आईचे निर्गवी, शांत संयमी रूप या कवितेतून प्रकट होते. संस्कारक्षम आई विरुद्ध मातृत्व नाकारणाऱ्या स्त्रीला ही कवी प्रश्न विचारतो. रस्त्यावर कोवळे अर्भक टाकून पळून गेलेली माता पाहून कवीचे मन हळहळते.ही व्यथा बोलकी होऊन कवितेच्या रुपात प्रकटते....' कोवळ्या अर्भकाचा काय दोष 'या कवितेतून जग कसं निष्ठुर झालं आहे.या समाजात संवेदना निर्माण करण्याची आज खरी वेळ आली आहे.असेही कवी प्रखरपणे मांडतो.आज महापूरासारख्या गंभीर स्वरूपाच्या समस्येला सामोरे जावे लागते आहे.अवकाळी कोसळणाऱ्या पावसाच्या महापुराने गावची गाव नष्ट होत आहे.या नैसर्गिक कोपाचे ही कवीने दोन कवितेतून समर्थन केले आहे.कोरोना या महामारीने विश्व हादरले. सांस्कृतिक ,सामाजिक,राजकीय,आर्थिक सर्व बाबीनी माणसाची कोंडी झाली.अशा संकट समयी कवी एकजुटिने लढण्याचा,त्याचा सामना हिमतीनं करण्याचा संदेश देतात.तसेच शिवाजी महाराज,भीमा तुझ्या रूपाने यांसारख्या कवितेतून आदर्श पुरुषांच्या मूल्यांची थोरवीचे महात्म्य ही कवी पटवून देतात. कैवार मध्ये प्रेमाचं वर्णन करणाऱ्याही काही कविता आढळतात.प्रेम म्हणजे काय ?,आठवणीच्या पुस्तकामध्ये,मुक मन ,सांग ना सखे,ओढ ,अन् मला वाटतंय, प्रेमाच्या विविध भावछटाचे इंद्रधनुषी आलेखन या कवितेतून चित्रित झाले आहे.शिवाजी शिंदे यांचा हा पहिला कविता संग्रह जरी असला तरी त्यात नवखेपण कुठेही दिसत नाही.एका अभ्यासू, संशोधक, प्रौढ कवीची ही कविता आहे. असे या कवितेच्या निर्मितीतून जाणवते.कवितेचे विषय,मांडणी, या सर्वच दृष्टीने कैवार मधील ही कविता आगळी वेगळी ठरते.ती दुःखाला केवळ कवटाळून न बसता त्या दुखांची कारणमीमांसा घडवून आणते.आपल्या हातून अशीच कसदार निर्मित होत राहो.हार्दिक शुभेच्छा...

-७५५९३२२८७६

# वाचलेली... भावलेली पुस्तके..!

**संजय राऊत** (मुंबई)

सिंहासन - अरुण साधू
कऱ्हेचे पाणी - आचार्य अत्रे
मी आणि माझा बाप - नरेंद्र जाधव
सारे प्रवासी घडीचे - जयवंत दळवी
पानिपत - विश्वास पाटील
गोलपीठा - नामदेव ढसाळ
गीताई - विनोबा भावे

**अतुल देऊळगावकर** (मुंबई)

कोलाहल - वसंत गुर्जर
मोरी नींद नसानी होय - जयवंत पवार
ब्रँड फॅक्टरी - मनोहर सोनवणे
तुम्ही बी घडा ना - अंतोनी व्हिक्स
अनु.सुलक्षणा महाजन,करुणा गोखले
अवघा देहचि वृक्ष झाला - वि.ना.गवाणकर

**सचिन पाटील** (शिरपूर)

युगांत - इरावती कर्वे
सर्वोत्तम भूमिपुत्र गौतम बुध्द - आ.ह.साळुंखे
माणसे आरभाट आणि चिल्लर - जी.ए.कुलकर्णी
रात्र काळी घागर काळी - चि.त्र्यं.खानोलकर
गाई घरा आल्या - इंद्रजीत भालेराव
द फ्री व्हॉईस - रवीश कुमार
धागे आडवे उभे - अनिल अवचट
एका तेलियाने - गिरीश कुबेर

**शिल्पा जैन** (शिरपूर)

मुसाफीर - अच्युत गोडबोले
सिंहाचा छावा - चंद्रकांत कुंभार
श्यामची आई - साने गुरुजी
राजे शिवछत्रपती - बाबासाहेब पुरंदरे
स्वामी - रणजित देसाई

**एम.के.भामरे** (शिरपूर)

मृत्यंजय - शिवाजी सावंत
व्यक्ती आणि वल्ली
पुर्वरंग - पु.ल.देशपांडे

**विजय गायकवाड** (समीक्षक,कोल्हापूर)

इगो इज द एनिमी - रायन हॉलीडे
अवेकन द जायंट विदिन - एंथिनी रॉबिन्स
द गॉड डिल्यूजन - रिचर्ड डॉकिन्स
अभिनव जलनायक - सतिश खाडे
द इमोनशल इंटेलिजन्स - डॅनियल गोलमन
चकवा चांदणं - मारुती चितमपल्ली

**रामनाथ कराड** (अहमदनगर)

काजवा - पोपट काळे.
नाना मी साहेब झालो- विष्णू औटी

**आशाताई रंधे** (शिरपूर)

मदर तेरेसा - इंद्रायणी सावकार
द सेकंड सेक्स - सिमेन द बोव्हुआर
पिठाई ते पिकवे - शुभांगी पाटील
अंधश्रध्दा निर्मुलन पत्रिका/साधना
शिवरायांचा स्त्री विषयक दृष्टीकोन-
डॉ.दिनेश मोरे

**डॉ.नीता सोनवणे** (धुळे)

वर्पुझा - व.पू.काळे
छावा - शिवाजी सावंत
मृण्मयी - गो.नी.दांडेकर

**माधव कदम** (नंदुरबार)

पत्रास कारण की - अरविंद जगताप
प्लाटोन - डॉ.संजय ढोले
शुन्य ते शिखर - प्रकाश बियाणे
हु मूव माय चेस - डॉ.स्पेन्सर जॉन्सन
नांगरणी - आनंद यादव
डोंगरी ते दुबई - अशोक पाध्ये
श्यामची आई - साने गुरुजी
सर्वोत्तम भुमिपुत्र गौतम बुध्द -

Reg No. MAHMAR2015/67226 शिक्षणयात्री Postal Registration No.DHL/557/2021-23











# सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ४०० रूपये  द्विवार्षिक वर्गणी - ७०० रूपये  त्रैवार्षिक वर्गणी-१००० रूपये

ई अंक (फक्त पी.डी.एफ.) व्दिवार्षिक वर्गणी - ५००

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

With pay any app

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री

शैलनंद,प्लॉट नं.५२ शिवपार्वती कॉलनी करवंद नाका शिरपूर ता.शिरपुर जि-धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)


Postal Registration No.DHL/557/2021-23

संपादक - शिक्षण यात्री
शैलनंद,प्लॉट नं.५२ पार्वती कॉलनी,
करवंद नाका,शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
४२५४०५

प्रती, ..................................................

..................................................

..................................................

Pragati Arts Shirpur 8421356261